दैनिक

# ग्लोबल भारत

वृत्तपत्र क्षेत्रातील खणखणीत नाणं

dailyglobalbharat@gmail.com

संपादक - शरद खेमचंद अडागळे

www.globalbharatlive.com

❑ औरंगाबाद ❑ वर्ष ५ वे ❑ अंक १४१ वा ❑ शुक्रवार दि.१४ फेब्रुवारी २०२५ ❑ पाने ८ ❑ मुल्य ५ रू


## वक्फ बोर्ड दुरुस्ती विधेयकाचा अहवाल बनावट, आम्ही स्वीकारणार नाही

### मल्लिकार्जुन खरगे राज्यसभेत कडाडले

नवी दिल्ली दि.१३ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- संसदेत अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पहिल्या टप्प्यातील कामकाजाचा आज शेवटचा दिवस आहे. वक्फ (दुरुस्ती) विधेयकाचा विचार करणाऱ्या संयुक्त संसदीय समितीचा (जेपीसी) अहवाल गुरुवारी राज्यसभेत मांडण्यात आल्यानंतर सभागृहात एकच गोंधळ झालाय. टीएमसी आणि काँग्रेसनं अहवालाला विरोध दर्शवलाय. गोंधळामुळे राज्यसभेचे कामकाज काही काळासाठी तहकूब करण्यात आलं होतं. सभापती जगदंबिका पाल यांनी विधेयकाशी संबंधित अहवाल आणि पुराव्यांचे रेकॉर्ड सभागृहाच्या टेबलावर ठेवले. त्याचवेळी लोकसभेचे कामकाज दुपारी २ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आलंय. परंतु राज्यसभेत गोंधळ झालाय.

३१ जानेवारीपासून सुरू झालेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशन २०२५ चे पहिले सत्र गुरुवारी संपण्याची अपेक्षा असल्याने सर्वांचे लक्ष नवीन आयकर विधेयकावर आहे, जे आज लोकसभेत सादर केले जाण्याची शक्यता आहे, तर संयुक्त संसदीय समिती (जेपीसी) चा अहवाल दोन्ही सभागृहात मांडण्यात आलाय. केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजुरी दिल्यानंतर एका आठवड्यात अर्थमंत्री निर्मला सीतारमण नवीन आयकर विधेयक सादर करतील, अशी अपेक्षा आहे. या विधेयकाचा उद्देश विद्यमान आयकर कायदा, १९६१ला सोपे आणि सुव्यवस्थित करणे आहे, जो सामान्य करदात्यांना अनेकदा समजण्यास कठीण वाटतो. दरम्यान, प्रमुख जगदंबिका (पान ४ वर)

## राजन साळवी यांचा अखेर शिंदे गटात प्रवेश

### उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी धनुष्यबाण दिला हाती

मुंबई दि.१३ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- राजन साळवी यांनी ठाणे येथे उपमुख्यमंत्री व शिवसेना शिंदे गटाचे प्रमुख एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत पक्षात प्रवेश केला आहे. एकनाथ शिंदे हे आपले राजकीय गुरु असल्याचे राजन साळवी यांनी म्हंटले आहे. ठाणे येथील आनंद आश्रमात राजन साळवी यांनी एकनाथ शिंदे यांच्यासह स्वर्गीय आनंद दिघे यांच्या प्रतिमेचे दर्शन घेतले.

पक्षात प्रवेश केल्यानंतर राजन साळवी म्हणाले, ९ तारीख या दिवशी भाईचा वाढदिवस असतो. त्या दिवशी मी भाईना भेटलो आणि म्हणालो की या शुभ दिवशी मला आता पक्षात यायचे आहे. त्यावेळी माझ्यासोबत रत्नागिरी जिल्ह्यातील अनेक पदाधिकाऱ्यांनी शिवसेनेत प्रवेश केला आहे. कुटुंबातला सदस्य म्हणून भाईनी माझ्यावर प्रेम केले. एक छोटा भाऊ म्हणून मला त्यांनी मार्गदर्शन दिले. एक दुःख आहे नक्कीच भाई मुख्यमंत्री होत असताना मी त्यांच्या सोबत राहू शकलो नाही. २००६ ला मी निवडणुकीत मी पराभूत झालो.

२०२४ च्या निवडणुकीत मला पराभवाला सामोरे जावे लागले. याला जबाबदार कोण हे आपल्याला माहीत आहे. हा पराभव मला आणि माझ्या कुटुंबाच्या जिव्हारी लागला. माझ्या पराभवाला जी माणसे कारणीभूत आहेत, त्या संबंधीची माहिती तसेच पुरावे मी उद्धव ठाकरे यांच्याकडे दिले होते. त्यानंतर मला वाटले आता थांबावे, पण मतदारसंघातील माणसे, त्यांचा विकास, जिल्ह्याचा विकास यासाठी मी पुन्हा उमेदीने उभे राहिले पाहिजे असे आग्रह या मंडळींनी धरला. विकासाच्या दृष्टीने विचार करता एकनाथ शिंदे यांचे नेतृत्व महाराष्ट्राने स्वीकारले आहे. त्यांच्या नेतृत्वात पुन्हा एकदा



शिवसेना, धनुष्यबाण घेऊन लोकांमध्ये जाऊ, असे राजन साळवी म्हणाले. राजन साळवी म्हणाले, दुधात साखर पडली की दूध मधुर होते, तसेच आम्ही आता शिवसेनेत प्रवेश केल्यावर पुढे सगळे मधुरच होणार. मी भाईला सांगू इच्छितो मला काही नको. मला कशाची अपेक्षा नाही. मात्र, माझे कार्यकर्ते, माझे पदाधिकारी यांना मान सन्मान मिळाला पाहिजे, (पान ४ वर)

## राज्यात जीबीएसचं थैमान!, पुण्यात आणखी एक बळी, रुग्णसंख्या २०० पार

पुणे दि.१३ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)-राज्यात गुलेन बॅरी सिंड्रोमचे रूग्ण दिवसेंदिवस वाढत असून दररोज रुग्णांच्या संख्येत वाढ होत आहे. तर मागील २४ तासांमध्ये जीबीएसच्या आणखी एका रुग्णाचा मृत्यू झाला आहे. त्यानुसार आतापर्यंत जीबीएसमुळे ८ जणांचा बळी गेला आहे. राज्यात जीबीएसच्या रुग्णांची संख्या दोनशे पार गेली आहे. तर आत्तापर्यंत १०९ जणांना डिस्चार्ज देण्यात आला आहे. यातून ५४ रुग्णावर आयसीयूमध्ये उपचार सुरू आहेत, तर २० जण व्हेंटिलेटवर आहेत.

गुलेन-बॅरी सिंड्रोम या मेंदूविषयक आजाराच्या रुग्णसंख्येने २००चा टप्पा ओलांडला आहे. जीबीएसची राज्यातील रुग्णसंख्या २०३ इतकी झाली आहे. यांपैकी १७६ रुग्णांची निदान निश्चिती करण्यात आली आहे. बुधवारी (दि. १२) शहरात एका ५९ वर्षीय रुग्णाचा जीबीएसमुळे मृत्यू झाल्याची माहिती आहे. राज्यात एकूण ८ मृत्यूंची नोंद झाली आहे.

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अहवालानुसार, २०३ रुग्णांपैकी ९४ रुग्ण महापालिकेत नव्याने समाविष्ट झालेल्या गावांमधील आहेत. तसेच, ४१ रुग्ण पुणे (पान ४ वर)

## निर्मला सीतारमण यांनी लोकसभेत सादर केले प्राप्तिकर विधेयक २०२५

नवी दिल्ली दि.१३ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी आज लोकसभेत प्राप्तीकर विधेयक २०२५ सादर केलं आहे. लोकसभेच्या पटलावर मी हे विधेयक ठेवते आहे असं त्या म्हणाल्या. त्यावेळीही विरोधकांचा गदारोळ सुरुच होता. तसंच काही विरोधकांनी हे विधेयक सादर होण्याआधीच सभागृहाचा त्याग केला. ए.के. प्रेमचंदन यांनी घेतलेले आक्षेप योग्य नाही. प्राप्तीकराचा कायदा १९६१ मध्ये तयार झाला. त्यावेळी त्यात २९८ कलमं. मात्र वर्षानुवर्षे यात नवी कलमं समाविष्ट करण्यात आली. आता या कायद्यातील कलमांची संख्या ८१९ आहे अशी माहिती निर्मला सीतारमण यांनी दिली.

आता आम्ही ५६१ कलमांचं विधेयक घेऊन आलो आहोत. मनिष तिवारी म्हणाले की नव्या प्राप्तिकर विधेयकात जास्त कलमं आहेत मात्र ते तसं नाही. आम्ही ८१९




कलमांऐवजी आता ५६१ कलमांचं विधेयक घेऊन आलो आहोत. आत्तापर्यंतच्या विधेयकात ४ हजारांहून अधिक वेळा सुधारणा करण्यात आल्या. त्यामुळे मनिष तिवारी यांनी बहुदा हे विधेयक पाहण्याचेही कष्ट घेतले नसावेत असा टोला निर्मला सीतारमण यांनी लगावला.

विरोधी पक्षाने केलेल्या आरोपांमध्ये तथ्य नाही. आम्ही हे सांगू शकतो या की या विधेयकात आम्ही यांत्रिक नाही तर धोरणात्मक बदल केले आहेत. असंही निर्मला सीतारमण यांनी स्पष्ट केलं. भारतीय कर प्रणालीमध्ये अनेक वर्षांमध्ये अनेक सुधारणा झाल्या आहेत, ज्यामुळे १९६१ चा प्राप्तिकर कायदा अधिकाधिक गुंतागुंतीचा झाला आहे. सध्याच्या कर फ्रेमवर्कमध्ये अशा अनेक सूट, वजावट आणि तरतुदींचा समावेश आहे; ज्यामुळे अनेकदा करदात्यांमध्ये गोंधळ होतो आणि कर विभाग व व्यक्ती किंवा व्यवसाय यांच्यात वाद निर्माण होतात. सरकार अनेक वर्षांपासून करविषयक कायदे सुलभ करण्यासाठी हे विधेयक आणण्यात आलं आहे.

मध्यमवर्गीयांनी दीर्घकाळापासून कर सवलतीची मागणी केली आहे आणि २०२५ च्या अर्थसंकल्पात (पान ४ वर)

## प्रसिद्ध शास्त्रीय गायक पंडित प्रभाकर कारेकर यांचे निधन



मुंबई दि.१३ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- प्रसिद्ध शास्त्रीय गायक पंडित प्रभाकर कारेकर यांचे बुधवारी रात्री निधन झाले. ते ८० वर्षांचे होते. त्यांच्या कुटुंबीयांनी गुरुवारी ही माहिती दिली. पंडित कारेकर यांनी मुंबईतील शिवाजी पार्क येथील राहत्या घरी अखेरचा श्वास घेतल्याचे कुटुंबीयांनी सांगितले. ते काही काळापासून आजारीही होते. गोव्यात जन्मलेले पंडित प्रभाकर कारेकर हे त्यांच्या प्रसिद्ध भजन बोलावा विठ्ठल पहावा विठ्ठल आणि वक्रतुंड महाकायसाठी ओळखले जात होते. ते उत्कृष्ट गायक होते. ऑल इंडिया रेडिओ आणि दूरदर्शनवरही अनेक वर्षे रसिकांनी त्यांच्या कडून सांगीतिक पर्वणी अनुभवली.

मराठी शास्त्रीय आणि नाट्य संघातील धारदार आवाज ही पंडित प्रभाकर कारेकर यांची ओळख (पान ४ वर)

## परळीच्या फौजदारी न्यायालयाची धनंजय मुंडेंना कोर्टाची कारणे दाखवा नोटीस, माहिती दडवल्याचा आरोप

परळी दि.१३ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)-मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणाला दोन महिने उलटून गेले आहेत. अन्नपुरवठा मंत्री धनंजय मुंडेंच्या राजीनाम्याच्या मागणीचा जोर वाढला आहे. दरम्यान विधानसभा निवडणुकीच्या उमेदवारी अर्ज आत खरी माहिती दडवल्याचा आरोप करुणा शर्मा यांनी दाखल केला होता. याच तक्रारीवरून मंत्री धनंजय मुंडे यांच्या अडचणी वाढल्या आहेत. परळीच्या फौजदारी न्यायालयाने मंत्री धनंजय मुंडे यांना मोठा झटका दिलाय. धनंजय मुंडेंना कोर्टाने कारणे दाखवा नोटीस बजावण्याचा आदेश दिला आहे. एकीकडे राजीनामाच्या मागणीचा दबाव वाढतं असताना दुसरीकडे न्यायालयाचा आदेश महत्त्वाचा मानला जातोय.

विधानसभा निवडणुकीच्या दरम्यान उमेदवारी अर्ज भरताना खरी माहिती दडविल्याबाबत करुणा मुंडे यांनी दाखल केलेल्या ऑनलाईन तक्रारीच्या अनुषंगाने परळीच्या फौजदारी न्यायालयाने मंत्री धनंजय मुंडे यांना न्यायालयाची कारणे दाखवा नोटीस बजावण्याचा आदेश दिला आहे.

कोर्टाने बजावलेल्या कारणे दाखवा नोटिशीवर २४ फेब्रुवारी २०२५ रोजी परळीच्या फौजदारी न्यायालयात सुनावणी होणार आहे. धनंजय मुंडे यांनी २०२४ मध्ये परळी विधानसभा निवडणूक लढविण्यासाठी दाखल उमेदवारी अर्जासोबतच्या शपथपत्रात पत्नी राजश्री मुंडे आणि तीन मुली तसेच करुणा मुंडे यांच्या दोन मुलांचा उल्लेख केला होता. परंतु करुणा मुंडे यांच्या नावावरील मिळकतीबाबत कुठलाही उल्लेख केला नव्हता. त्यांनी वरील खरी माहिती दडविल्याबाबत करुणा मुंडे यांनी बीड येथून परळीच्या फौजदारी न्यायालयात ऑनलाइन तक्रार केली होती. तक्रारीची मूळ कागदपत्र पाच फेब्रुवारी रोजी न्यायालयासमोर दाखल केली. त्यावरूनच न्यायालयाने वरीलप्रमाणे (पान ४ वर)

## दलाई लामा यांना मिळणार झेड श्रेणीची सुरक्षा

### गुप्तचर विभागाच्या अहवालानंतर केंद्रीय गृह मंत्रालयाचा निर्णय

नवी दिल्ली दि.१३ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)-बौद्ध धर्मगुरू दलाई लामा यांना आता झेड श्रेणीची सीआरपीएफ सुरक्षा मिळणार आहे. गुप्तचर विभागाच्या अहवालानंतर केंद्रीय गृह मंत्रालयाने हा निर्णय घेतला आहे.

गुप्तचर विभागाने गृह मंत्रालयाला एक अहवाल सादर केला होता. यामध्ये दलाई लामा यांना धोका असण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली होती. यानंतर केंद्रीय गृह मंत्रालयाने त्यांची सुरक्षा वाढवण्याचा आदेश जारी केला असल्याचे वृत्त ने दिले आहे.

दरम्यान १९३५ मध्ये ल्हामो थोंडुप यांचा जन्म झालेल्या दलाई लामा यांना वयाच्या दोन वर्षापासून तिबेटी आध्यात्मिक नेते म्हणून त्यांच्या पूर्वसुरींचा पुनर्जन्म मानले जाते. १९४० मध्ये तिबेटची राजधानी ल्हासा येथे त्यांना १४ वे दलाई लामा म्हणून तिबेटी आध्यात्मिक नेते म्हणून मान्यता देण्यात आली. १९५० मध्ये चीनने तिबेटवर हल्ला केला.

१९५९ मध्ये चीनविरुद्धच्या अयशस्वी उठावानंतर दलाई लामा भारतात आले. तेव्हापासून हिमाचल प्रदेशातील धर्मशाला शहरात त्यांचे वास्तव्य आहे. दलाई लामा वर्षानुवर्षे तिबेटींच्या न्यायासाठी लढत आहेत. १९८९ मध्ये त्यांना नोबेल शांतता पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

## मराठा आंदोलक म्हणून कारवाई करणार असाल तर खपवून घेणार नाही; मनोज जरांगेंचा इशारा

जालना दि.१३ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)-कुणबी नोंदी सापडलेल्या राज्यातील पात्र मराठा समाजाला मराठा-कुणबी, कुणबी-मराठा प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही निश्चित करणाऱ्या माजी मुख्य न्यायमूर्ती संदीप शिंदे यांच्या अध्यक्षतेखालील समितीला तब्बल दीड महिन्यानंतर मुदतवाढ देण्यात आली आहे. या समितीची मुदत ३१ डिसेंबर २०२४ रोजी संपली होती. सामान्य प्रशासन विभागाने शासन निर्णय जारी करून समितीला ३० जून २०२५ पर्यंत मुदतवाढ दिली. यातच अलीकडेच आमरण उपोषण स्थगित केल्यानंतर आता मनोज जरांगे पाटील यांचे अंतरवाली सराटीत १५ फेब्रुवारीपासून बेमुदत साखळी उपोषण सुरू होणार असून, त्याचे लोण राज्यभरात पसरणार आहे. यातच मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा इशारा दिला आहे.

राज्यात मराठा आरक्षणाचे आंदोलन पेटल्यानंतर राज्य सरकारने सप्टेंबर २०२३ मध्ये मराठा समाजाला मराठा-कुणबी, कुणबी-मराठा जातीचे जात प्रमाणपत्र देण्याच्या प्रक्रियेत आवश्यक त्या अनिवार्य पुराव्यांची वैधानिक आणि प्रशासकीय तपासणी करून पात्र व्यक्तींना कुणबी जातीचे जात प्रमाणपत्र देण्याची कार्यपद्धती निश्चित करण्यासाठी शिंदे यांची समिती नेमली होती. सुरुवातीला या समितीला एक महिन्याची मुदत देण्यात आली होती. मात्र, समितीची कार्यकक्षा वाढल्यानंतर कामाची व्याप्ती लक्षात घेऊन समितीला डिसेंबर २०२३ पर्यंत पहिली मुदतवाढ देण्यात आली होती. समितीने मराठवाड्यातील नोंदीबाबतचा आपला अहवाल डिसेंबर २०२३ मध्ये सरकारला सादर केला होता. यावर मनोज जरांगे पाटील यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

राज्य सरकारने शिंदे समितीला मुदत वाढ दिली. आता त्या समितीला मनुष्यबळ द्या. समितीला बसवून ठेवू नका. फक्त मुदत वाढ (पान ४ वर)

## संजय राऊत शरद पवारांकडे जाऊन माफी मागतील, रामदास कदमांचा प्रहार

मुंबई दि.१३ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- खासदार संजय राऊत हे केवळ प्रसिद्धीसाठी बोलतात, पुढच्या दोन दिवसात संजय राऊत शरद पवारांची जाऊन माफी मागतील अशी टीका शिवसेना शिंदे गटचा नेते रामदास कदम यांनी केली. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा शरद पवार यांच्या हस्ते पुरस्कार देऊन सत्कार करण्यात आला होता. यावरुन संजय राऊत यांनी शरद पवार यांच्यावर टीका केली होती. यावरुन आज रामदास कदमांनी राऊतांवर प्रहार केला.

दोन दिवसात संजय राऊत शरद पवार यांची जाऊन माफी मागतील असं वक्तव्य रामदास कदम यांनी केलं आहे. संजय राऊत एकाच दगडात दोन पक्षी मारत आहेत.एकनाथ शिंदे यांचे कर्तृत्व आहे, म्हणून त्यांना पुरस्कार मिळाला. उध्दव ठाकरेंचं कर्तृत्व काय? असा सवाल देखील रामदास कदम यांनी केला. शरद पवार हे देशातील मोठे नेते आहेत. आपण कोणावर टीका करत आहोत, याचे भान संजय राऊत यांनी ठेवायला हवं असंही रामदास कदम यावेळी म्हणाले.

राजन साळवी यांच्या शिवसेना शिंदे गटातील प्रवेशावर देखील रामदास कदमांनी प्रतिक्रिया दिली. राजन साळवींचा पक्ष प्रवेश (पान ४ वर)

## उद्धव ठाकरे यांच्या पक्षाकडून मराठ्यांच्या स्वाभिमानाचा अपमान

### ज्योतिरादित्य सिंधिया यांची टीका; मराठा समाज पाहत असल्याचा इशारा

मुंबई दि.१३ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)-उद्धव ठाकरे यांच्या पक्षाकडून मराठ्यांच्या स्वाभिमानाचा अपमान केला गेला असल्याचा आरोप केंद्रीय मंत्री ज्योतिरादित्य सिंधिया यांनी केला आहे. हे सर्व मराठा समाज पाहत असल्याचा इशारा देखील त्यांनी दिला आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना दिल्या गेलेल्या महादजी शिंदे पुरस्कारावरून संजय राऊत यांनी टीका केली होती. त्याला आता ज्योतिरादित्य सिंधिया यांनी प्रत्युत्तर दिले आहे.

बाळासाहेब ठाकरे यांचा आदर्श नाकारून जेव्हा हिंदुत्वाचाच नव्हे तर मराठ्यांच्या स्वाभिमानाचा अपमान करून त्यांना मराठा सन्मान कसा समजणार? असा प्रश्न ज्योतिरादित्य सिंधिया यांनी उपस्थित केला आहे. ज्यांनी स्वतःच्या समाजात आपला आधार आणि आदर गमावला आहे. ते इतरांच्या आदराने त्रस्त असल्याचा आरोप देखील त्यांनी केला. यासंबंधी ज्योतिरादित्य सिंधिया यांनी एका पोस्टच्या माध्यमातून उद्धव ठाकरे यांच्या पक्षावर निशाणा साधला आहे.

या संबंधी ज्योतिरादित्य सिंधिया यांनी एका पोस्टच्या



माध्यमातून संजय राऊत आणि उद्धव ठाकरे यांच्या पक्षावर टीका केली. आपल्या पोस्टमध्ये सिंधिया म्हणाले की, मराठा समाज सर्व काही पाहतोय! बाळासाहेब ठाकरे यांचा आदर्श नाकारून केवळ हिंदुत्वाचाच नव्हे तर मराठ्यांच्या स्वाभिमानाचाही अपमान करून मराठा सन्मान कसा समजणार? ज्यांनी स्वतःच्या समाजात आपला आधार आणि आदर गमावला आहे ते इतरांच्या आदराने त्रस्त आहेत.

खासदार संजय राऊत म्हणाले की, ‘‘तुम्हाला माहिती आहे का हा पुरस्कार कोणी दिला? राजकीय नेत्यांना दिले जाणारे असे पुरस्कार एकतर विकत घेतले जातात किंवा विकले जातात. दिल्लीत (पान ४ वर)

## ६५ वर्षांवरील रिक्षा चालकांना १० हजार मिळणार, आनंद दिघे महामंडळाच्या बैठकीत प्रताप सरनाईकांची घोषणा

मुंबई दि.१३ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)-‘‘आम्ही कल्याकारी मंडळ निर्माण केलंय. या मंडळाच्या माध्यमातून जे आदर्श रिक्षा चालक आहेत. आम्ही त्यांना पुरस्कार देणार आहोत. पाच वर्षांपूर्वीची नोंदणी असलेले ६५ वर्षांच्या वरिल जे काही रिक्षा चालक आहेत, त्यांना आम्ही प्रत्येकी १० हजार रुपयांचं अनुदान देणार आहोत. याला अनुदान म्हणा किंवा पुरस्कारही म्हणता येईल. हे अनुदान आम्ही एकदाच देणार आहोत. १० हजार पुरस्कार म्हणून एकदाच देणार आहोत. आमच्या डिपार्टमेंटने माहिती काढलीये. आजच्या घडीला राज्यात १४ हजार ३८७ रिक्षालाचक हे ६५ वर्षांवरिल आहेत. त्यांना यावर्षी आम्ही १० हजारांची रक्कम देणार आहोत‘‘, अशी घोषणा परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केली. ते मुंबई पार पडलेल्या आनंद दिघे महामंडळाच्या बैठकीत बोलत होते.

प्रताप सरनाईक म्हणाले, ज्यावेळी माजी मुख्यमंत्री आणि शिवसेना पक्षाचे प्रमुख नेते आदरणीय एकनाथ शिंदे साहेबांनी आमच्या दिघे साहेबांच्या नावाने मंडळ स्थापन केलं. आम्ही आता निर्णय घेतलाय की, २७ जानेवारी हा या महामंडळाचा वर्धापन दिन असेल. ५० कोटी रुपयांची तरतूद या महामंडळासाठी करण्यात आलेली आहे. धर्मवीर आनंद दिघे साहेब (पान ४ वर)

# बोलका भाजप, अबोल संघ!

'आकंठ' राजकीय डुबकीचे चित्र असतानाही संघ अव्यक्त आहे. नेत्यांच्या मुक्ताफळांमुळे भाजपच्या बातम्या फुटतात. काही दशकांपूर्वी कोणत्याही बऱ्यावाईट घडामोडींसाठी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला जबाबदार धरले जायचे. 'यामागे संघाचा हात आहे' असे बेछूट बोलले जायचे. आज राजकारणातील सरशी सरसकट संघाच्या नावे करण्याचा काळ आहे. अक्षम्य दुर्लक्षापासून अतिशय दमदार कर्तबगारीपर्यंतची वाटचाल गाठायला संघाला शंभर वर्षे लागली. हरियाणा, महाराष्ट्रापाठोपाठ राजधानी दिल्लीच्या निवडणुकांतील यश 'संघकर्तव्या'तून साकारल्याच्या बातम्या उमटल्या. संघाने थेट राजकीय अजेंड्याचे कंत्राट स्वीकारले काय, याबाबत अनेकांना उत्कंठा आहे. या फंदात पडणे ही संघवृत्ती नाही. नेमका ताळेबंद कुणाला गवसणारही नाही. संघश्रेष्ठींच्या वर्तुळाचा कानोसा घेतला असता अशा घाऊक राजकीय बैठकांची कोणतीही जाहीर रणनीती संघ आखत नाही. राजकीय साहाय्याची मागणी होताच ऐन वेळी संघरसद रवाना होते, हा लोकभ्रम आहे. संघाचा पहिला थेट राजकीय हस्तक्षेप आणीबाणीत दिसला. त्यानंतर परिवारातील अधिकृत ३२ उपशाखांद्वारे सर्वस्पर्शी संवादावर संघाचा भर राहिला. गुप्तता पाळून लक्ष्यवेधी काम ही संघाची शिकवण आहे. त्या बातम्या राजकीय आघाडीतून फुटतात. त्याबद्दलची नाराजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी पुण्यातील 'जयपूर डायलॉग'मध्ये बोलून दाखविली. माध्यमांमध्ये सर्जनशीलता उरली नसल्याची त्यांची खंत होती. संघ कधीही पत्रकार परिषद घेत नसतानाही आतले डावपेच डाव्यांना कसे कळतात, या प्रश्नावर फडणवीस यांनी स्वनिर्मित बातम्यांचा दाखला दिला. 'अफवा पसरविल्यानंतरही संघ सहसा प्रतिवाद करीत नाही. भाजपचे काही कार्यकर्ते आणि नेते यांना मात्र प्रसिद्धीचा रोग जडला आहे. त्याशिवाय कुंभस्नानानंतरही पाप धुतले जाणार नाही या भ्रमात ते वावरतात,' या शब्दांत मुख्यमंत्र्यांनी राजकीय गुप्तता न पाळणाऱ्यांना चिमटा काढला. धीरोदात्त संघवर्तुळातून माहिती काढणे सोपे नसते. संघाच्या प्रतिनिधी सभेच्या बैठकीला भाजपचे प्रतिनिधी जातात. संघाकडून राजकीय पुनर्संघटनेसाठी ज्येष्ठ कार्यकर्तेही पुरविले जातात. दीनदयाळ उपाध्याय, नानाजी देशमुख, अटलबिहारी वाजपेयींसारखे प्रचारक संघानेच जनसंघाला दिले. दीनदयाळ उपाध्याय राजकीय कारकिर्दीसाठी अनुत्सुक होते. संघ आदेशांच्या अवहेलनेची परंपरा नसल्याने पाणावलेल्या नेत्रांसह त्यांनी आज्ञेचे पालन केले. दत्तोपतं ठेंगडींना जनसंघातून कालांतराने भारतीय मजदूर संघाकडे वळविण्यात आले. तत्पूर्वी त्यांना संघानेच इंटक, आयटकमधील अनुभव घ्यायला लावला होता. 'राजकारण हे चिखलासमान आहे. त्यात उतरून आपल्याला स्वच्छ राहता येणार नाही. पर्यायी स्वच्छ जलस्रोत तयार करून तो चिखल धुऊन काढणे हाच त्यावरील उपाय आहे,' असे द्वितीय सरसंघचालक गोळवलकर गुरुजी म्हणायचे. त्यांनी राजकारणाला 'वारांगना' म्हटले होते. आत्मसमर्पित पिढीची निर्मिती हा संघाचा हेतू आहे. याच सोशिकतेचे कौतुक शरद पवारांसारख्या मुरब्बी नेत्यालाही करावेसे वाटले. स्वातंत्र्याच्या शताब्दीपर्यंत कुटुंबव्यवस्थेपुढील जागतिक संकट भारतीय संस्कारांद्वारे थोपवून धरण्याचे आव्हान स्वयंसेवक पेलणार आहेत. अशा स्थितीत पतंग उडविणाऱ्या 'सूत्रां'कडे संघ गंभीरतेने बघत बसणार नाही. दिल्लीत भाजपचे नेते गुलाल उधळत असताना ६ ते १६ फेब्रुवारीच्या काळात सरसंघचालक डॉ. मोहन भागवत पश्चिम बंगालमध्ये मुक्कामाला आहेत. एक कोटी सदस्यांचे लक्ष्य ठरविल्यानंतरही ममतांच्या भूमीत भाजपला ४० लाखांच्या पुढे जाता आलेले नाही. लवकरच तिथे विधानसभा निवडणुका आहेत. सत्ता आल्यानंतरही महाराष्ट्राचे 'शिवधनुष्य' जिकिरीचे आहे. संघाची शिस्तप्रियता कोळून प्यायलेल्या देवाभाऊंनी राज्य भाजपमधील बोलक्या पोपटांवर छडी उगारलीच, तर आश्चर्य वाटायला नको.

# प्रेमीयुगुलांसाठी प्रेमाचा उत्सव

# व्हॅलेन्टाईन्स डे !

भारतात मोठ्या प्रमाणावर हा दिवस प्रेमीयुगलांकडून साजरा केला जातो. तथापि, 'व्हॅलेन्टाईन्स डे हा आपल्या संस्कृती विरुद्ध आहे' असे म्हणून भारतातील बजरंग दल व इतर कट्टरतावादी हिंदू धार्मिक संघटना याला विरोध करतात, असे असतानाही 'व्हॅलेंटाईन डे' भारतामध्ये जास्त प्रमाणात लोकप्रिय होत आहे. दरवर्षी 'व्हॅलेन्टाईन्स डे' हा प्रेम दिवस म्हणून १४ फेब्रुवारी रोजी जगभर साजरा केला जातो. हा एकप्रकारे प्रेमीयुगुलांसाठी प्रेमाचा आणि रोमांसचा अनोखा उत्सवच आहे. हा एक ख्रिश्चन सण सुद्धा आहे तसेच या दिवशी लोक त्यांच्या प्रियकर-प्रेयसी, जोडीदार किंवा आपल्या आवडत्या व्यक्तीला शुभेच्छा संदेश, फुले, सुंदर भेटवस्तू किंवा चॉकलेट पाठवून प्रेम व्यक्त करतात. या दिवसाची सुरूवात एका रोमन उत्सवापासून झाली. रोममध्ये उन्हाळ्याच्या दिवसांत 'लुपरकॅलिया' नावाचा उत्सव साजरा केला जायचा. या उत्सवात मुले बॉक्समधून मुलींच्या नावे काढत असत. उत्सवा दरम्यान ही जोडपी प्रेयसी-प्रियकर बनून फिरत असत आणि कधी-कधी ते लग्नबंधनात देखील बांधली जात. नंतर तेथील चर्च ख्रिश्चन उत्सव म्हणून आणि संत व्हॅलेंटाईनच्या स्मरणार्थ हा दिवस एखाद्या सणाप्रमाणे साजरा करण्यास सुरूवात केली. यानंतर लोक आपलं प्रेम व्यक्त करण्यासाठी सेंट व्हॅलेंटाईन नावाचा वापर करू लागले.

असं म्हणतात, प्रेम ही एक अशी भावना जी व्यक्त होताच चेहरा खुलतो, बहर येतो. तसं बघितलं तर प्रेमाची भावना व्यक्त करण्यासाठी कुठल्याही ठराविक वेळेची किंवा जागेची गरज नसते. ३६५ दिवस हे प्रेमाचेच असतात पण 'व्हॅलेंटाइन डे' की बात ही कुछ और ही है ! प्रेमाच्या या दिवसाने तरुणाईला वेड लावलं, असंही म्हटल्यास वावगं ठरणार नाही. अगदी ठरवून या दिवशी कुणी प्रेमात पडत नाही, मात्र तरीही वर्षभर याची तयारी सुरू असते. सेंट व्हॅलेंटाइनने याला विरोध करून काही सैनिकांचा विवाह लावून दिला. आणखी एक जोड संत व्हॅलेंटाईनने ख्रिश्चन सैनिकांसाठी विवाह केले ज्यांना लग्न करण्यास मनाई होती. केलेडियसला हे समजल्यानंतर त्याने व्हॅलेंटाइनला तुरुंगात डांबलं. तुरुंगात असतानाच व्हॅलेंटाइनचा जीव जेलरच्या मुलीवर आला. प्रेम केल्याची शिक्षा म्हणून १४ फेब्रुवारीला व्हॅलेंटाइनला फाशी देण्यात आली होती. फाशीच्या आदल्या दिवशी व्हॅलेंटाइनने प्रेयसीला स्वाक्षरी केलेले पत्र लिहिले आणि पत्राचा शेवट 'युअर व्हॅलेंटाइन' असा केला. तेव्हापासूनच १४ फेब्रुवारीला हा दिवस साजरा केला जातो. व्हॅलेंटाईन डे सेंट व्हॅलेंटाईन नावाच्या ख्रिश्चन हुतात्म्यांच्या नावाने साजरा केला जातो. एका दंतकथेनुसार ख्रिश्चन संत व्हॅलेन्टाईनचा हा बलिदान दिवस आहे. परंतु युरोप मध्ये अजूनही संदिग्धता आहे की, नक्की कोणत्या व्हॅलेन्टाईन नावाच्या व्यक्तिपासून सुरुवात झाली. नंतरच्या काळात जगातील अनेक ठिकाणी प्रणय आणि प्रेमाचा एक महत्त्वपूर्ण सांस्कृतिक, धार्मिक आणि व्यावसायिक उत्सव बनला. सेंट व्हॅलेंटाईन बद्दल एकमत नसले तरी त्याबद्दल अनेक कथा प्रचलित आहेत पण सर्वात लोकप्रिय कथा रोमन किंग क्लॉडियस आणि सेंट व्हॅलेंटाईन यांची आहे. क्लॉडियसने आपल्या सैनिकांना लग्न करण्यास मनाई केली होती, पण सेंट व्हॅलेंटाईनने अनेक सैनिकांना लग्नासाठी तयार केले आणि त्यांचे लग्न लावून दिले. राजाला राग अनावर झाल्याने त्याने १४ फेब्रुवारी २६९ रोजी संत व्हॅलेंटाईनला फाशीवर चढवलं.

पाश्चात्य ख्रिश्चन चर्च हे व्हॅलेन्टाईन डे १४ फेब्रुवारीला साजरा करतात आणि पूर्व सनातनी चर्च ६ जुलै/३० जुलै रोजी साजरा करतात. तिसऱ्या शतकात रोमन साम्राज्यात छळलेल्या ख्रिश्चनांची सेवा केल्याबद्दल रोमच्या सेंट व्हॅलेंटाईनला तुरुंगात टाकल्याच्या वृत्तासह, १४ फेब्रुवारीशी जोडलेल्या विविध व्हॅलेंटाईनशी संबंधित अनेक हौतात्म्य कथा आहेत. सुरुवातीच्या परंपरेनुसार, सेंट व्हॅलेंटाईनने त्याच्या जेलरच्या अंध मुलीला दृष्टी बहाल केली. दंतकथेतील नंतरच्या अनेक जोडांनी ते प्रेमाच्या थीमशी अधिक चांगले जोडले आहे. व्हॅलेंटाईनचा उत्सव पोप गेलेसियस-१ याने इ.स. ४९६ मध्ये स्थापन केला होता, जो रोमच्या संत व्हॅलेंटाईनच्या सन्मानार्थ १४ फेब्रुवारी रोजी साजरा केला जातो, जो इ.स. २६९ मध्ये त्या तारखेला मरण पावला. हा दिवस १४ व्या आणि १५ व्या शतकात रोमँटिक प्रेमाशी जोडला गेला जेव्हा दरबारी प्रेमाच्या कल्पना फुलल्या, वरवर पाहता वसंत ऋतूच्या सुरुवातीच्या "लव्हबर्ड्स"च्या सहवासामुळे. १८ व्या शतकातील इंग्लंडमध्ये हे अशा प्रसंगात वाढले, ज्यामध्ये जोडप्यांनी फुले सादर करून मिठाईची ऑफर देऊन आणि ग्रीटिंग कार्डे ('व्हॅलेंटाईन' म्हणून ओळखले जाते) पाठवून एकमेकांबद्दलचे प्रेम व्यक्त केले. आज वापरल्या जाणाऱ्या व्हॅलेंटाईन डे चिन्हांमध्ये हृदयाच्या आकाराची बाह्यरेखा, कबूतर आणि पंख असलेल्या कामदेवाची आकृती समाविष्ट आहे. १९ व्या शतकापासून हस्तलिखित व्हॅलेंटाईनने मोठ्या प्रमाणावर उत्पादित ग्रीटिंग काड्‌र्सला मार्ग दिला आहे. इटलीमध्ये सेंट व्हॅलेंटाईन कीज प्रेमींना 'एक रोमँटिक प्रतीक आणि देणाऱ्याच्या हृदयाला अनलॉक करण्यासाठी आमंत्रण म्हणून' तसेच मुलांना अपस्मार (ज्याला सेंट व्हॅलेंटाईन मॅलाडी म्हणतात) पासून दूर ठेवण्यासाठी दिल्या जातात.

व्हॅलेंटाईन डे ची कोणत्याही देशात सार्वजनिक सुट्टी नाही, जरी तो अँग्लिकन कम्युनियन आणि लुथेरन चर्चमध्ये अधिकृत मेजवानीचा दिवस आहे. ईस्टर्न ऑर्थोडॉक्स चर्चचे अनेक भाग ६ जुलै रोजी रोमन प्रेस्बिटर सेंट व्हॅलेंटाईनच्या सन्मानार्थ आणि ३० जुलै रोजी इंटरअम्ना (आधुनिक टर्नी)चे बिशप हायरोमार्टीर व्हॅलेंटाईन यांच्या सन्मानार्थ सेंट व्हॅलेंटाईन डे साजरा करतात. व्हॅलेंटाईन डे प्रथा ग्रीटिंग कार्ड पाठवणे, मिठाई आणि फुले सादर करणे. सुरुवातीच्या आधुनिक इंग्लंडमध्ये विकसित झाले आणि १९ व्या शतकात इंग्रजी भाषिक जगामध्ये पसरले. २० व्या शतकाच्या उत्तरार्धात आणि २१ व्या शतकाच्या सुरुवातीच्या काळात, या प्रथा इतर देशांमध्ये पसरल्या, जसे की हॅलोवीन, किंवा ख्रिसमसच्या पैलूंपेक्षा, (जसे की सांताक्लॉज). हा दिवस अनेक पूर्व आशियाई देशांमध्ये साजरा केला जातो ज्यामध्ये सिंगापूर, चिनी आणि दक्षिण कोरियाचे लोक व्हॅलेंटाइनच्या भेटवस्तूंवर सर्वाधिक पैसे खर्च करतात.

आपण हा दिवस होममेड कार्ड, मिठाई, गुलाब, रोमँटिक डेट, मित्रांसमवेत वेळ घालवून साजरा करू शकतो आणि हा दिवस साजरा करण्याचे अजूनही बरेच मार्ग आहेत.

आपण रोमँटिक डिनर किंवा लंचसाठी बाहेर जाऊ शकता किंवा कोणत्याही रोमँटिक ठिकाणी वेळ घालवू शकता. या दिवशी आपण आपल्या प्रियजनांना आवडत्या भेटवस्तू किंवा एखादा गोड पदार्थ देऊन नात्यातील स्नेह वाढवू शकता. या दिवशी एखाद्यावरील प्रेम व्यक्त करू शकता. व्हॅलेंटाईन डे मुलगा किंवा मुलगी कोणा एकासाठी नसून हा दिवस दोघांसाठी असतो. हा दिवस दोघेही साजरा करू शकतात. हा आनंदाचा किंवा प्रेमाचा उत्सव केवळ जोडप्यांसाठीच नव्हे तर मनातील प्रेमासाठी साजरा केला जातो आणि आपल्या मनातील ते प्रेम कोणासाठीही असू शकते. त्यामुळे हा दिवस तुम्ही आई-बाबा, भाऊ-बहिण, मित्रमैत्रीण कोणासाठीही साजरा करू शकता. आपल्या मनातील व्हॅलेंटाईन कोणीही असू शकतं. या दिवशी आपण आपल्या प्रियजनांना अनेक प्रकारचे प्रेमळ, रोमँटिक, सुंदर संदेश पाठवू शकता. असे संदेश जे प्रेमाची भावना व्यक्त करणारे किंवा या दिवसाचे महत्त्व सांगणारे असतात. सर्वांना व्हॅलेंटाईन डे च्या प्रेमळ शुभेच्छा !

**– प्रवीण बागडे**
**नागपूर**

# साहित्य सोनियाच्या खाणी

नवी दिल्ली येथे ९८ वे अ. भा. मराठी साहित्य संमेलन होत आहे. यापूर्वी १९५४ साली नवी दिल्ली येथे अ. भा. मराठी साहित्य संमेलन झाले होते. तथापि, महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर देशाच्या राजधानीत होणारे हे पहिलेच साहित्य संमेलन असून, मराठीला अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झाल्याची पार्श्वभूमी या संमेलनास आहे. या अनुषंगाने सांगली जिल्ह्यातील साहित्य, साहित्यिक व साहित्य चळवळीवर प्रकाशझोत टाकणारा साहित्य अकादमीचे सदस्य, अविनाश सप्रे यांचा माहितीपूर्ण लेख

सांगली जिल्ह्याची वाङ्मयीन परंपरा उज्ज्वल आणि अभिमानास्पद आहे. अनेक समकालीन, तरूण लेखक, कवी आपल्या सर्जनाने साहित्याच्या विविध प्रवाहातून सांगली जिल्ह्याची साहित्य संस्कृती वर्तमानात पुढे नेत आहेत.

सुप्रसिद्ध इतिहास संशोधक वासुदेवशास्त्री खरे हे लेखक केशवसुतांचे समकालीन होते. 'समुद्र' हे १३२ श्लोकांचे त्यांचे दीर्घकाव्य १८८४ साली प्रकाशित झाले. यशवंतराव होळकरांच्या जीवन आणि कर्तृत्वाचे वर्णन करणारे यशवंतराव हे खंडकाव्य १८८८ साली प्रकाशित झाले. गुणोत्कर्ष, तारामंडल, चित्रवंचना, कृष्णकांचन, उग्रमंगल आणि शिवसंभव ही त्यांची गाजलेली नाटके. संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनादिनी (१ मे १९६०) चित्रपती व्ही. शांताराम यांनी बाबूराव पेंढारकरांच्या सहकार्याने 'शिवसंभव' चा मुंबईमध्ये भव्य स्वरूपाचा प्रयोग केला होता. मिरजेचे 'खरे वाचन मंदिर' हे त्यांच्या कार्याचे स्मारक आहे. या ग्रंथालयाच्या वतीने दरवर्षी होणारी वसंत व्याख्यानमाला एक जुनी आणि नामवंत व्याख्यानमाला असून महाराष्ट्रातल्या नामवंत लेखक, वक्ते, विचारवंत इत्यादिंना या ज्ञानयज्ञातून ऐकण्याची संधी श्रोत्यांना मिळत असते.

राजकवी साधुदास हे सांगली संस्थानातले एक आदरणीय कवी होते. 'विहार', 'वनविहार', 'रणविहार' अशी त्यांनी रामायणावर आधारित महाकाव्य रचना केली. पेशवे काळावरच्या पौर्णिमा', 'प्रतिपदा' आणि व्दितिया या त्यांच्या प्रसिद्ध कादंबऱ्या होत.

काव्यविहारी (गद्रे) हे यानंतरचे एक महत्त्वाचे कवी होते. रविकिरण मंडळाच्या काव्यदृष्टीचा आणि रचनापद्धतीचा त्यांच्या काव्यलेखनावर प्रभाव होता. 'काव्यविहार', 'स्फूर्तिलहरी', 'स्फूर्तिनिनाद', 'स्फूर्तिविलास' हे त्यांचे काव्यसंग्रह असून नाट्य सुगंध आणि नाटककार देवल व्यक्ती आणि वाङ्मय हे त्यांचे नाट्यसमीक्षा ग्रंथही प्रसिद्ध आहेत.

विलिंग्डन महाविद्यालयाचे पहिले प्राचार्य गो. चिं. भाटे यांची 'प्रेम की लौकिक' ही कादंबरी विषयाच्या वेगळेपणामुळे तत्कालीन कादंबरी विश्वात गाजली होती. त्यांनी प्रवास वर्णन हा वाङ्मय प्रकारही प्राचुर्याने हाताळला. कानडी वाङ्मयात मोलाचे योगदान देणारे प्राचार्य गोकाक आणि प्राचार्य मुगळी यांची वाङ्मयीन कारकीर्द इथेच बहरली. साहित्यसम्राट न. चिं. केळकर यांचे प्राथमिक शिक्षणही मिरजेच्या शाळा नं. १ मध्ये झाले.

उद्योग आणि उन्नतीचे संस्कार मराठी मनावर घडवणारी आणि नव्याने उदयाला येत असलेल्या शिक्षित मध्यमवर्गाची वैचारिक आणि वाङ्मयीन अभिरूची घडवणारी 'किर्लोस्कर', 'स्त्री' आणि आणिवा ही सुप्रसिद्ध मासिके सुरवातीला अनेक वर्षे या जिल्ह्यातील किर्लोस्करवाडीतून प्रकाशित होत होती. नियतकालिकांच्या इतिहासात या मासिकांना अत्यंत महत्त्वाचे असे स्थान आहे. मासिकांचे संस्थापक संपादक शंकरराव किर्लोस्कर आणि नंतरचे संपादक मुकुंदराव किर्लोस्कर यांचे या संदर्भातले योगदान मौल्यवान आहे.

कवी सुधांशु आणि कथाकार म. भा. भोसले यांनी औदुंबर येथे सुरू केलेले सदानंद साहित्य संमेलन सत्तर वर्षांहून अधिक काळ अखंडपणे दरवर्षी मकर संक्रातीच्या दिवशी भरत असते. महाराष्ट्रातल्या मुख्य साहित्य संमेलनांव्यतिरिक्त ग्रामीण भागात भरणारे महाराष्ट्रातले हे पहिले साहित्य संमेलन होय. या संमेलनाला महाराष्ट्रातले जवळजवळ सर्व ख्यातनाम लेखक, कवी, नाटककार, ललित लेखक, समीक्षक अध्यक्ष म्हणून हजर राहिले आहेत. जिल्हास्तरावरची सर्वात जास्त म्हणजे जवळपास १६ साहित्य संमेलने सांगली जिल्ह्याच्या विविध भागात दरवर्षी नियमितपणे भरत असतात. मराठीतले मान्यवर ज्येष्ठ लेखक या संमेलनांना अध्यक्ष म्हणून आवर्जून येत असतात.

अखिल भारतीय
मराठी साहित्य संमेलन, दिल्ली
२०२५

स्फुटकाव्य आणि खंडकाव्य लिहिणारे रविकिरण मंडळाचे एक संस्थापक सदस्य कवी गिरीश (शं. के कानेटकर) यांचे सांगलीमध्ये वास्तव्य होते. त्यांचे सुपुत्र आणि पुढे महाराष्ट्रातले एक ख्यातनाम नाटककार म्हणून प्रसिद्धी पावलेले वसंत कानेटकर यांचे शिक्षण विलिंग्डन महाविद्यालयात झाले आणि आपल्या काही महत्त्वाच्या नाटकांचे लेखनही त्यांनी इथेच केले.

महाराष्ट्राचे लाडके व्यक्तिमत्व पु. ल. देशपांडे हेही विलिंग्डन महाविद्यालयात पदव्युत्तर शिक्षणासाठी सांगलीत वास्तव्यास होते. मराठी साहित्यातील ज्येष्ठ आणि थोर लेखक आणि मराठीतला पहिला ज्ञानपीठ पुरस्कार ज्यांना मिळाला, ते वि. स. खांडेकर मूळचे सांगलीचेच. गणेश आत्माराम खांडेकर हे त्यांचे मूळ नाव. पुढे दत्तक गेल्यावर ते विष्णु सखाराम खांडेकर झाले. त्यांचे शिक्षण सांगली हायस्कूलमध्ये झाले. नंतरचे ज्ञानपीठ पुरस्कार विजेते कवी विं. दा. करंदीकर यांचे वास्तव्यही शिक्षक म्हणून काही काळ तासगावला होते. सुरवातीच्या कविता त्यांनी इथेच लिहिल्या होत्या. सर्वश्री ग. दि. माडगूळकर, शंकरराव खरात, व्यंकटेश माडगूळकर, ना. सं. इनामदार आणि प्रा. म. द. हातकणंगलेकर या सांगली जिल्ह्यातील प्रतिभावंत कवी, लेखक आणि समीक्षकांना मराठी साहित्य संमेलनांचे अध्यक्षपद भूषविण्याचा मान मिळाला.

वंचित, उपेक्षित, बहिष्कृत म्हटल्या गेलेल्या जमातीचे अनोखे दर्शन घडवणारे आणि संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीला आपल्या लेखणीने बुलंद करणारे शाहीर अण्णाभाऊ साठे, लावणीचे अध्वर्यू पठ्ठे बापूराव, अपरिचित अनुभवांचे सशक्त चित्रण करणारे श्री. दा. पानवलकर, दलितांच्या वेदना आणि दुःखांना शब्दरूप देणारे कथाकार बंधुमाधव, ग्रामीण जीवनाचे अंतरंग उलगडणारे चारुता सागर, देवदत्त पाटील, भक्तीरसाचा आविष्कार करणारे कवी सुधांशु, गीतकार पी. सावळाराम, कवी व लोकसाहित्याचे अभ्यासक अशोकजी परांजपे, गीतकार सुधीर मोघे, लोकसाहित्याच्या अभ्यासक सरोजिनी बाबर, तारा भवाळकर, सय्यद अमीन, सुलेखनकार र. कृ. जोशी, जीवनातील विरुपतेचे दर्शन घडविणाऱ्या कमल देसाई, प्राकृत साहित्याचे संशोधक ग. वा. तगारे, पानिपतकार विश्वास पाटील इत्यादींनी आपल्या प्रतिभासामर्थ्याने आणि सौंदर्याने सांगली जिल्ह्याचे नाव आणि लौकिक वृद्धींगत केला आहे. अनिल दामले, शैला सायनाकर, कथाकार वामन होवाळ, कवी अभ्यासक अरुण कांबळे तसेच ललित लेखनाचे नितांत सुंदर रूप दाखवणारे श्रीनिवास विनायक कुलकर्णी, प्रा. गौतमीपुत्र कांबळे, प्रा. जी. के. ऐनापुरे, साहित्य अकादमी अनुवाद पुरस्कार प्राप्त वसंत केशव पाटील आणि बलवंत जेऊरकर, प्रा. वैजनाथ महाजन, कमलेश वालावलकर, संजीव खांडेकर यांच्यासारखे अनेक समकालीन, तरूण लेखक, कवी आपल्या सर्जनाने साहित्याच्या विविध प्रवाहातून सांगली जिल्ह्याची साहित्य संस्कृती वर्तमानात पुढे नेत आहेत

**– अविनाश सप्रे**
(लेखक साहित्य अकादमीचे सदस्य आहेत)

***

**ग्लोबल भारत** हे पत्र मालक मुद्रक प्रकाशक संपादक **शरद खेमचंद अडागळे** यांनी विश्व प्रकाशन प्रिंटर्स औरंगाबाद जालना हायवे रोड बदनापुर जिल्हा जालना(महाराष्ट्र) पिन ४३१२०२ येथे छापुन दैनिक ग्लोबल भारत कार्यालय हाऊस नं १/११/ ११७ शांतीपुरा नंदनवन कॉलनी रोड छावणी औरंगाबाद (महाराष्ट्र) पिन ४३१००१ येथे प्रकाशित केला मो ९४०३५०२५५५ / हॉटसअप ९९२११७३९५३, ईमेल dailyglobalbharat@gmail.com
(या अंकात व्यक्त केलेल्या मजकुराशी संपादक, मालक, मुद्रक, प्रकाशक सहमत नाहीत.,औरंगाबाद न्यायालया अंतर्गत)

# श्रीगोंदा येथे शासकीय योजनांचा महामेळावा संपन्न

## समाजातील वंचित घटकांच्या विकासातूनच प्रगतशील आणि संपन्न राष्ट्र निर्माण होईल-न्यायमूर्ती विभा कंकणवाडी

अहिल्यानगर दि.१३ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- देश स्वातंत्र्याच्या अनेक वर्षानंतरही संविधानाने दिलेले हक्क, अधिकारांबाबत समाजातील अनेक घटक अनभिज्ञ आहेत. शेवटच्या घटकापर्यंत त्यांचे हक्क, अधिकाराची माहिती पोहोचाविण्यासोबतच शासनाच्या विविध योजनांद्वारे समाजातील वंचित घटकांच्या विकासातूनच प्रगतशील व संपन्न राष्ट्र निर्माण होईल, असा विश्वास मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती तथा अहिल्यानगर जिल्ह्याचे पालक न्यायमूर्ती श्रीमती विभा कंकणवाडी यांनी व्यक्त केला.

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, तालुका विधी सेवा समिती व तालुका वकील संघ, श्रीगोंदा यांच्या संयुक्त विद्यमाने श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय श्रीगोंदा येथे शासकीय सेवा व योजनांचा महामेळावा व प्रत्यक्ष लाभ वितरण कार्यक्रमाचे उद्घाटन मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती तथा अहिल्यानगर जिल्ह्याचे पालक न्यायमूर्ती श्रीमती विभा व. कंकणवाडी व न्यायमूर्ती संतोष चपळगावकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी त्या बोलत होत्या.

कार्यक्रमास प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या अध्यक्षा श्रीमती अंजू शेंडे, जिल्हा न्यायाधीश तथा श्रीगोंदा तालुका विधी सेवा समिती अध्यक्ष मुजीब शेख, जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ, जिल्हा पोलीस अधीक्षक राकेश ओला, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या सचिव भाग्यश्री पाटील, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संभाजी लांगोरे,श्रीगोंदा तालुका वकील संघाचे अध्यक्ष अशोक वाळुंज आदी उपस्थित होते.

न्यायमूर्ती विभा कंकणवाडी म्हणाल्या, शासनाच्या योजनांचा लाभ घेण्यासाठी लाभार्थी निकषांची पूर्तता करत असला तरी केवळ योजनांच्या माहितीचा अभाव असल्यामुळे योजनांचा लाभ त्यांना घेता येत नाही. सर्वांच्या सहकार्यातून घेण्यात येत असलेले अशा प्रकारचे मेळावे शासनाच्या योजनांच्या सफलतेसाठी उपयुक्त ठरत आहेत. न्यायपालिका व प्रशासनाच्या पुढाकाराने एकाच छताखाली मेळाव्याचे आयोजन हा सामाजिक न्याय देणारा कार्यक्रम असल्याचेही त्या म्हणाल्या.

संविधानाने प्रत्येकाला दिलेल्या अधिकारांची, हक्कांची माहिती असणे आवश्यक आहे. समाजातील आदिवासी, दुर्बल,निरक्षरांना त्यांच्या हक्कांची माहिती नाही. त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शासन अनेक योजना राबवित असले तरी या योजना प्रत्येक गरजूपर्यंत पोहोचविण्याची जबाबदारी ही आपल्या प्रत्येकाची असल्याचेही त्या म्हणाल्या.

जिल्ह्यात शासनाच्या अनेक योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी केल्याबद्दल जिल्हाधिकारी श्री.सालीमठ तसेच प्रशासनातील अधिकारी-कर्मचाऱ्यांचे कौतुक करत भूसंपादन प्रकरणामध्ये जमीनधारकाला तातडीने मोबदला देण्यासाठी निधी वेळेत उपलब्ध होण्यासाठी पाठपुरावा करण्याची सूचनाही त्यांनी यावेळी केली.

न्यायमूर्ती संतोष चपळगावकर म्हणाले, न्यायाची संकल्पना केवळ न्यायालयातून न्यायदान एवढीच न ठेवता त्याची व्याप्ती वाढवून संविधानाचे उद्दिष्ट लक्षात घेत कायद्यात बदल करून विधी सेवा प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली. विधी सेवा प्राधिकरण हे न्याय संस्थेचे एक अंग असून आर्थिक पाठबळ आणि कायद्याचे ज्ञान नसलेल्यांना मदतीचा हात देण्याचे काम हे प्राधिकरण करत आहे. न्यायाच्या कक्षा रुंदावल्या गेल्या आहेत. कार्यक्रमातून शासनाच्या योजनांच्या लाभाच्या वाटपावेळी लाभार्थ्यांच्या डोळ्यात दिसलेला आनंद हाच खरा न्याय असल्याचेही ते म्हणाले.

प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश अंजू शेंडे म्हणाल्या, न्यायाची परिभाषा केवळ शब्दांमधून उतरवलेला न्यायनिर्णयाने न ठरता समाजातील प्रत्येकापर्यंत न्याय पोहोचून जगण्यासाठी बळ देण्याच्या संकल्पनेतून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. शासनाच्या अनेक योजना आहेत. शासन आणि प्रशासन यांच्यातील दुवा म्हणून न्यायपालिका काम करत आहे. गतकाळात विधी प्राधिकरणामार्फत पॅनइंडिया कार्यक्रम घेण्यात आला.या माध्यमातून हेल्पलाईन, मनोन्याय, बालस्नेही, मनोधैर्य योजना यशस्वीपणे राबविण्यात आल्या. कायद्याच्या ज्ञानाबरोबरच शासकीय योजनांचा लाभ सामान्यांपर्यंत पोहोचविण्याचे काम प्राधिकारणाच्यावतीने करण्यात येत असल्याचेही त्या म्हणाल्या.

जिल्हाधिकारी श्री. सालीमठ म्हणाले, शासन आपल्या दारी उपक्रमातून जिल्ह्यातील २५ लाखापेक्षाही अधिक लाभार्थ्यांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ देत जिल्हा राज्यात अग्रेसर ठरला. तसेच लाडकी बहिण योजनेंतर्गत १२ लाख महिला भगिनींना लाभ देण्यात आला. प्रधानमंत्री आवास योजना ( ग्रामीण) योजनेच्या पहिल्या टप्प्यात जिल्ह्याने उद्दिष्ट पूर्ण केले असून दुसऱ्या टप्प्यात सर्व मान्यता देण्यात आल्या आहेत. सेवा हमी कायद्यात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून सेवा देण्यावर भर देण्यात येत असल्याचेही ते म्हणाले.

प्रास्ताविकात भाग्यश्री पाटील म्हणाल्या, समाजातील शेवटच्या घटकापर्यंत शासनाच्या विविध योजनांचा लाभ पोहोचवून त्यांचे जीवनमान उंचावण्याच्यादृष्टीने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमात शासनाच्या विविध विभागांच्या एकूण ४८ स्टॉलची उभारणी करण्यात आली आहे. हा कार्यक्रम केवळ एक दिवसापूरता न राहता तो अविरतपणे सुरू राहील. जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्यावतीने तडजोडीने विविध प्रकरणे



मिटवण्याचा प्रयत्न केला जातो. गतवर्षात प्राधिकरणाच्या माध्यमातून १२ हजार ७९ प्रकरणे तर मध्यस्थी केंद्राच्या माध्यमातून १ हजार १०३ प्रकरणे तडजोडीने मिटविण्यास यश आल्याचेही त्या म्हणाल्या. यावेळी शासनाच्या विविध योजनांच्या लाभार्थींना मान्यवरांच्या हस्ते प्रत्यक्ष लाभाचे वितरणही करण्यात आले.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी परिश्रम घेतलेल्या व्यक्तींचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. श्रीगोंदा तालुका विधी सेवा समितीचे अध्यक्ष तथा जिल्हा न्यायाधीश मुजीब शेख यांनी आभार व्यक्त केले. शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची सर्वसामान्यांना माहिती होऊन या योजनांची जागृती व्हावी या उद्देशाने श्रीगोंदा येथे आयोजित कार्यक्रमात शासनाच्या विविध विभागांच्या स्टॉलची उभारणी करण्यात आली होती. यामध्ये विधी सेवा प्राधिकरण, कृषी, महसूल, पंचायत समिती, जिल्हा परिषद, सामान्य रुग्णालय, महावितरण, महात्मा फुले कृषी विद्यापीठ, नगर पालिका, आरोग्य विभाग, महिला व बालकल्याण, भरोसा सेल, वन विभागासह इतर विभागांच्या स्टॉलचा समावेश होता. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते या स्टॉलचे उद्घाटन करण्यात आले. तसेच मान्यवरांनी या स्टॉलला प्रत्यक्ष भेट देत योजनांच्या अंमलबजावणीसह नागरिकांना झालेल्या लाभाची माहिती जाणून घेतली व लाभार्थ्यांशी संवाद साधला. कार्यक्रमास न्यायपालिकेतील अधिकारी, विधीज्ञ, प्रशासनातील अधिकारी, कर्मचारी तसेच नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## मत्स्य व्यवसाय व बंदर विकास मंत्री नितेश राणे यांच्या हस्ते ड्रोन प्रणालीचे मुंबई येथे उद्घाटन

पालघर दि.१३ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- सीमाभागातील अनधिकृत मासेमारीवर नियंत्रण मिळविण्यासाठी राज्यातील ७ जिल्ह्यांतील ९ समुद्र किनाऱ्यांवरून एकाचवेळी ड्रोनद्वारे देखरेख विशेष प्रणालीचे आज मत्स्य व्यवसाय व बंदर विकास मंत्री नितेश राणे यांच्या हस्ते आज मुंबई येथील मत्स्य आयुक्त कार्यालय येथे उद्घाटन झाले. याचवेळी पालघर जिल्ह्यातील शिरगाव या समुद्रकिनाऱ्यावरून पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून ड्रोन उडवण्यास प्रारंभ केला.

राज्यातील ७ जिल्ह्यांतील ९ समुद्र किनाऱ्यांवरून एकाचवेळी ड्रोनद्वारे देखरेख प्रणालीचे प्रात्यक्षिक यावेळी झाली. यासाठी मत्स्य आयुक्त कार्यालय येथे कंट्रोल रूम उभारण्यात आला आहे. मत्स्य व्यवसाय व बंदर विकास मंत्री नितेश राणे यांनी कंट्रोल रूममध्ये उपस्थित राहून या नवीन प्रणालीला ड्रोन उडवण्यास संबंधितांना आदेश दिले. त्याचे प्रात्यक्षिक यावेळी सादर करण्यात आले. पालघर जिल्ह्यातील शिरगाव, ठाणे जिल्ह्यातील उत्तन, मुंबई उपनगर जिल्ह्यातील गोराई, मुंबई शहर जिल्ह्यामधील ससून गोदी, रायगड जिल्ह्यातील रेवदंडा, श्रीवर्धन, रत्नागिरी जिल्ह्यातील मिरकरवाडा, साखरी नाटे तर सिंधुदुर्ग जिल्ह्यातील देवगड या नऊ समुद्रकिनाऱ्यावरून ९ ड्रोन उडवले गेली. यावेळी मत्स्य व्यवसाय सहायक आयुक्त दिनेश हंसराज पाटील, संबंधित विभागाचे अधिकारी/ कर्मचारी तसेच ग्रामस्थ मोठया संख्येने उपस्थित होते. यावेळी मंत्री श्री. राणे दूरदृश्य प्रणालीद्वारे म्हणाले की, ड्रोन यंत्रणा कार्यान्वित झाल्यानंतर राज्याच्या ७२० किलोमिटर लांबीच्या सागरी किनाऱ्यावरून राज्याच्या १२ मैल सागरी हद्दीपर्यंत बेकायदा मासेमारी करणाऱ्या अवैध नौकांवर ड्रोन कॅमेऱ्याद्वारे नजर ठेवली जाणार आहे. अशा अनाधिकृत नौकांची माहिती घेऊन त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यासाठी ड्रोन वेब सोल्युशनस स्ट्रिमिंगचा पुरावा म्हणून वापर केला जाणार आहे.

# सांगली जिल्ह्याच्या विकासासाठी वाढीव निधी देऊ-उपमुख्यमंत्री अजित पवार

सांगली दि.१३ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- सांगली जिल्ह्याच्या विकासासाठी जिल्हा वार्षिक योजनेतून वाढीव निधी देण्याचा प्रयत्न करू. निधीचा विनियोग योग्य पद्धतीने करावा, असे निर्देश राज्याचे उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री अजित पवार यांनी आज दिले.

पुणे येथे जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२५-२६ चे प्रारूप आराखडे अंतिम करण्यासाठी पुणे महसूल विभागातील जिल्ह्यांच्या राज्यस्तरीय बैठकीत ते बोलत होते. विभागीय आयुक्त कार्यालय पुणे येथे आयोजित या बैठकीस राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण, संसदीय कार्य मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील, खासदार विशाल पाटील, आमदार सर्वश्री सदाभाऊ खोत, इद्रिस नायकवडी, सुधीर गाडगीळ, डॉ. विश्वजीत कदम, सुहास बाबर, रोहित आर. आर. पाटील, नियोजन विभागाचे अप्पर मुख्य सचिव राजगोपाल देवरा, विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार, जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी तृप्ती धोडमिसे, महानगरपालिका आयुक्त शुभम गुप्ता, जिल्हा नियोजन अधिकारी अशोक पाटील व कार्यान्वयीन यंत्रणांचे अधिकारी प्रत्यक्ष तर जिल्ह्याच्या पालक सचिव विनिता वेद सिंगल ई- उपस्थित होत्या.

जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२५-२६ करिता नियोजन विभागामार्फत सांगली जिल्ह्यासाठी कमाल नियतव्यय ४३० कोटी ९७ लाख रूपये कळविण्यात आला होता. जिल्ह्याच्या स्थानिक गरजेनुसार कार्यान्वयीन यंत्रणांकडून २१८ कोटी रूपये अतिरीक्त निधी मागणी करण्यात आली. यावर बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली.

जिल्हा वार्षिक योजनेसाठी निधीची जरी मर्यादा घालून दिली असली तरी पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी जिल्ह्याच्या विकासासाठी अतिरीक्त निधीची मागणी केली आहे. वाढीव निधी देणार आहोत, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी यावेळी दिली.

जिल्हा वार्षिक योजनेतून चालू आर्थिक वर्षात दिलेला निधी विहित वेळेत खर्च करावा, असे सांगून उपमुख्यमंत्री पवार म्हणाले, सांगली जिल्ह्यातील मॉडेल स्कूल उपक्रमासाठी शासनाकडून निधी देऊ. त्याचबरोबर या उपक्रमासाठी लोकसहभाग व लोकवर्गणीसाठी प्रयत्न करावा. मॉडेल स्कूलमध्ये मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण करावे. केंद्र व राज्य शासनाच्या योजनांची सांगड घालण्यासाठी



प्रशासन प्रमुखांनी नियोजन करावे. शासकीय इमारती व महापालिका क्षेत्रातील पथदिवे व पाणीयोजनांची विजेची गरज सौरउर्जेतून भागवण्यासाठी प्रयत्न करावेत, अशा सूचना उपमुख्यमंत्री पवार यांनी यावेळी दिल्या. जिल्ह्यातील संरक्षित स्मारकांची यादी तयार करून त्यासंदर्भातील प्रस्ताव शासनास सादर करावा, असे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी सांगितले. बैठकीस जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींनी जिल्हा नियोजन समितीतून जिल्ह्याच्या विकासासाठी अधिकाधिक निधी देण्याचे आवाहन केले.

जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी यांनी सादरीकरण केले. यामध्ये सांगली जिल्ह्याच्या नियमित व नाविन्यपूर्ण योजनांतर्गत मागील तीन वर्षातील मंजूर व पूर्ण झालेल्या उत्कृष्ट कामांचे सादरीकरण करण्यात आले. साकव बांधकाम तसेच, सार्वजनिक आरोग्य यंत्रणेच्या बळकटीकरणासाठी जिल्हा नियोजन समितीच्या निधीमधून केलेल्या प्रयत्नांबद्दल यावेळी कौतुक करण्यात आले.

# कृषी क्षेत्रात 'एआय' तंत्रज्ञानाचा वापर करून शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावणार-कृषिमंत्री कोकाटे

रायगड दि.१३ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- शेतकऱ्यांचे जीवनमान अधिकाधिक समृद्ध करण्यासाठी कृषी क्षेत्रात सातत्याने आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणे गरजेचे आहे. राज्य शासन शेतकऱ्यांचे उत्पादन वाढविण्याबरोबरच त्यांच्या उत्पादन खर्चात बचत करण्यासाठी येत्या काळात कृषी क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्तेचा ('एआय'चा) वापर करण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे प्रतिपादन कृषीमंत्री ॲड. माणिकराव कोकाटे यांनी केले.

कृषिमंत्री श्री.कोकाटे यांच्या संकल्पनेतून प्रगतशील व प्रयोगशील शेतकरी परिसंवादाचे आयोजन विभागीय पातळीवर करण्यात आले. या अंतर्गत कोकण विभागातील ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या जिल्ह्यातील शेतकऱ्यांशी संवाद आणि चर्चा कार्यक्रमाचे आयोजन जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवन येथे करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते.

व्यासपीठावर कृषी आयुक्त सुरज मांढरे, कृषी संचालक रफिक नाईकवडी, कृषी सह संचालक अंकुश माने, कृषी रत्न पुरस्कार प्राप्त शेतकरी शेखर भडसावळे, अनिल पाटील, आत्मा प्रकल्प संचालक वंदना शिंदे उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना ॲड. कोकाटे म्हणाले, शेतकरी केंद्रस्थानी ठेवून




कामकाज होण्यासाठी समस्या,अभिप्राय तसेच सूचना विचारात घेऊन कृषी विभागात शेतकरीभिमुख कामकाजासाठी बदल करण्यात येत आहेत. शेतकरी व कृषी विभागाची सांगड घालून भविष्यात शेतीक्षेत्रात मोठया प्रमाणावर प्रगतीच्या संधी उपलब्ध होतील. कृषी विद्यापीठ यांनी केलेले प्रयोग, विकसित केलेले तंत्रज्ञान, हवामान बदल, पीक पद्धती याची माहिती तात्काळ शेतकऱ्यांना उपलब्ध करून देण्यासाठी प्रभावी कार्यपद्धती वापरावी. समाज माध्यमे, विविध संदेश वहनाची साधने वापरावी. तसेच शेतकऱ्याशी सातत्याने संवाद ठेवावा. कृषी विभागाची कार्यपद्धती अधिक प्रभावी होण्याच्या अनुषंगाने तसेच कृषी धोरण बनविताना शेतकऱ्यांच्या अडचणी, समस्या तसेच सूचना व प्रस्ताव यांचा समावेश करण्याच्या उद्देशाने या संवाद चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे.

रासायनिक खतांच्या वापरातून मानवी आरोग्यावर होणारे दुष्परिणाम टाळण्यासाठी शेतकऱ्यांनी आधुनिक तंत्रज्ञानासह सेंद्रिय शेतीकडे वळावे, असे आवाहन करून राष्ट्रीय सेंद्रिय सह.संस्थेच्या माध्यमातून सेंद्रिय मालाला हक्काची बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्नशील असल्याचेही ॲड. कोकाटे यांनी यावेळी सांगितले.

या परीसंवादात कोकण विभागातील आंबा, काजू, नारळ, चिकू, फणस, सुपारी, भात उत्पादक शेतकरी, कृषी पर्यटन, सेंद्रिय शेती, भाजीपाला व फूलशेती अशा विविध क्षेत्रातील शेतकऱ्यांनी प्रगतशील व प्रयोगशील शेतकऱ्यांनी राज्याला दिशा देणाऱ्या सूचना आणि अपेक्षा व्यक्त करताना, विविध योजनांचे थकित अनुदाने, खतांचे लिंकिंग, पीकविमा, पायाभूत आणि काढणीपश्चात सुविधांचा अभाव, पीकनिहाय अडी-अडचणी, पीक क्लस्टर आदीं महत्त्वपूर्ण विषयांसह शेतीतील आव्हाने, समस्या मांडल्या. कृषिमंत्री कोकाटे यांनी ४ तास चाललेल्या या बैठकीत शेतकऱ्यांचे सर्व म्हणणे ऐकून घेतले.ज्या ठिकाणी बदल शक्य आहेत, त्या विभागाशी चर्चा करून सुधारणा करण्यात येईल. तसेच ज्या योजना किंवा धोरणे केंद्र सरकारशी संबंधित आहे, त्यासाठी केंद्र सरकारकडे शिफारस व पाठपुरावा करण्यात येईल. ज्या ठिकाणी धोरणात्मक निर्णय, निधीची आवश्यकता आहे त्याबाबत वरिष्ठ पातळीवर चर्चा करून घेण्यात येतील असे आश्वासित केले.

कृषी आयुक्त सुरज मांढरे यांनी कृषी आयुक्तालयाच्या माध्यमातून शेतकरी केंद्रबिंदू मानून प्रभावी निर्णय, योजना यांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येईल. शेतकरी, विविध प्रयोगशील व्यक्ती, कृषी विद्यापीठ आणि शासन यांच्या संयुक्त प्रयत्नाने शेती मध्ये बदल घडवू शकतो. यासाठी सर्वांनी सहकार्य करावे असे सांगितले. यावेळी शेतकऱ्यांकडून कृषी योजना,कृषी निविष्ठा,नैसर्गिक आपत्ती,कृषी बाजार व्यवस्थापन याबाबत परिसंवाद प्रश्नावली भरून घेण्यात आली. आत्मा प्रकल्प संचालक वंदना शिंदे यांनी आभार मानले.

# कुंभमेळ्यातील गर्दी नियोजनाचे सूक्ष्म नियोजन करा-अपर मुख्य सचिव डॉ. आय. एस. चहल

## २०२७ मध्ये होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळा नियोजनाचा आढावा

नाशिक दि.१३ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- नाशिक-त्र्यंबकेश्वर येथे सन २०२७ मध्ये होणारा कुंभमेळा दुर्घटनारहीत, सुरक्षित होण्यासाठी गर्दी नियंत्रणाचे सूक्ष्म नियोजन करावे. साधूग्रामसाठी आवश्यक जागेसाठी भूसंपादनाच्या प्रक्रियेला गती द्यावी, अशा सूचना गृह विभागाचे अपर मुख्य सचिव डॉ. आय. एस. चहल यांनी येथे दिल्या.

जिल्हाधिकारी कार्यालयातील मध्यवर्ती सभागृहात आज सकाळी गृह विभागाचे अपर मुख्य सचिव डॉ. चहल यांनी सिंहस्थ कुंभमेळा नियोजनाचा आढावा घेतला. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, विशेष पोलिस महानिरीक्षक दत्तात्रय कराळे, पोलिस आयुक्त संदीप कर्णिक, जिल्हाधिकारी जलज शर्मा, महानगरपालिका आयुक्त मनीषा खत्री, नाशिक महानगर विकास प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. माणिकराव गुरसळ, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधीक्षक अभियंता अरुंधती शर्मा, पोलिस अधीक्षक विक्रम देशमाने, सहाय्यक जिल्हाधिकारी अर्पित चौहान, ओमकार पवार यांच्यासह विविध विभागांचे वरीष्ठ अधिकारी उपस्थित होते. डॉ. चहल म्हणाले की, आगामी कुंभमेळ्यासाठी कमी कालावधी राहिला आहे. या पार्श्वभूमीवर सर्व विभागांनी आपापल्या कामांना गती द्यावी. त्यासाठी सांघिक भावनेने काम करावे. मुख्यमंत्री लवकरच कुंभमेळ्यातील विविध कामांचा आढावा घेणार आहेत. घाट, नदी पात्राची स्वच्छता, कचऱ्याची विल्हेवाट याचेही नियोजन करावे. गर्दीच्या नियोजनासाठी प्रत्यक्ष क्षेत्रावर जाऊन पाहणी करावी. तसेच भक्कम बॅरिकेटस उभारावेत. त्यासाठी संबंधित व्यावसायिकांशी संवाद साधावा. गर्दी नियोजनासाठी स्वयंसेवकांची मदत घेता येईल का याचीही पडताळणी करीत त्याचेही नियोजन पोलिस दलाने करावे. सीसीटीव्ही यंत्रणा तातडीने कार्यान्वित करावी. सार्वजनिक बांधकाम विभागाने आपल्या कामांचे प्रस्ताव सादर करावीत, असेही निर्देश डॉ. चहल यांनी दिले. विभागीय आयुक्त डॉ. गेडाम यांनी सांगितले की, कुंभमेळ्यातील कामांना गती देण्याचे निर्देश देण्यात आले असून त्यांचा नियमितपणे आढावा घेतला जात आहे. जिल्हाधिकारी श्री. शर्मा यांनी कुंभमेळ्यानिमित्त सुरू असलेल्या तयारीची माहिती दिली, तर पोलिस आयुक्त श्री. कर्णिक, महानगरपालिका आयुक्त श्रीमती खत्री, पोलिस अधीक्षक श्री. देशमाने यांनी आपापल्या विभागातर्फे सुरू असलेल्या कामांची माहिती दिली.

# अभिनव उपक्रम, डिजीटल तंत्रज्ञानाने विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण द्यावे-उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

## शालेय शिक्षण विभागाचा आढावा; विद्यार्थी गळतीचे प्रमाण कमी करण्यासाठी ठोस उपाययोजना करा

मुंबई दि.१३ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- शालेय शिक्षण विभागाच्या माध्यमातून राज्यात अभिनव उपक्रम, प्रयोगांद्वारे डिजीटल तंत्रज्ञानाचा वापर करून विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण द्यावे. भविष्यकालीन धोरणांवर अधिक लक्ष केंद्रित करून विद्यार्थी गळतीचे प्रमाण कमी करण्यासाठी विभागाने अधिक जोमाने काम करावे आणि त्यासाठी ठोस उपाययोजना कराव्यात, असे निर्देश उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले.

सह्याद्री अतिथीगृह येथे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली शालेय शिक्षण विभागाची आढावा बैठक झाली. यावेळी शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर, शिक्षण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, शिक्षण विभागाचे प्रधान सचिव रणजितसिंह देओल, आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेच्या राज्य प्रकल्प संचालक आर. विमला, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेचे संचालक राहुल रेखावार यांच्यासह शालेय शिक्षण विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले, शाळा भेट उपक्रम स्तुत्य असून त्यामुळे शालेय व्यवस्थापन, शिक्षणाचा दर्जा, मुलांना देण्यात येणाऱ्या सुविधा, शाळेतील भौतिक सुविधा याची माहिती नियमित मिळण्यास मदत होईल. हा उपक्रम राज्यात प्रभावीपणे राबवण्यात यावा. शिक्षण विभागातील सर्व अधिकाऱ्यांनी आठवड्यातून किमान एका शाळेला भेट दिली पाहिजे. शाळा आणि वसतीगृहांना अचानक भेटी देण्यासाठी अधिकाऱ्यांनी पथके करावीत.

प्रत्येक विद्यार्थ्यामध्ये कला गुण असतात. त्यांना शालेयस्तरावरूनच वाव मिळाला पाहिजे. शिक्षण क्षेत्रास मदत, सहकार्य करण्यासाठी काम करण्यासाठी अनेक दानशूर व्यक्ती व संस्था इच्छुक आहेत. या व्यक्तींचे तसेच सामाजिक संस्थांचे सहकार्य घ्यावे. गुणवत्तापूर्ण शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांचे आरोग्य महत्वाचे आहे. मुलांची नियमित आरोग्य तपासणी केली जावी. यासाठी आरोग्य विभागाचे सहकार्य घ्यावे, असेही उपमुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले.

शिक्षणाचा दर्जा, गुणवत्ता वाढीसाठी सांगली, सातारा जिल्ह्यात राबविण्यात आलेल्या स्मार्ट स्कूल उपक्रमाची माहिती घ्यावी आणि हा उपक्रम राज्यात सुरू करावा, असे निर्देशही उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी दिले.

शिक्षण मंत्री श्री. भुसे म्हणाले, पीएमश्री शाळा योजनेच्या धर्तीवर सीएमश्री शाळा योजना राबविण्यात येणार आहे. या योजनेतंर्गत तालुकास्तरावर किमान एक आदर्श शाळा निर्माण केली जाणार आहे. ही शाळा डिजिटल सुविधांनी परिपूर्ण करून शाळेत ग्रंथालय, लॅब, क्रीडा विभाग यासाठी आवश्यक साधने दिली जाणार आहेत.

यावेळी उपमुख्यमंत्र्याच्या



हस्ते शाळा गुणवत्ता मुल्यांकन आणि आश्वासन आराखड्याचा शुभारंभ करण्यात आला.

## गंजगाव रेती घाटावर पोलिसांची धाड, २३ टिप्पर व ट्रक, २ पोकलेन ताब्यात

कुंडलवाडी दि.१३ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- गंजगाव येथील रेती घाटावर पोलीस अधिक्षक अबिनाश कुमार यांच्या पथकाने अचानक धाड टाकून दोन जेसीबीसह रेती वाहतूक करणारी २३ हायवा वाहनासह ३ कोटी १५ लाख १४ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला. यामुळे तालुक्यातील रेती तस्करासह रेती ठेकेदारही धास्तावले असल्याचे दिसून येत आहे.लाल रेतीसाठी प्रसिद्ध असलेल्या गंजगाव येथील रेती घाटावर देगलूरचे उपविभागीय पोलीस अधिकारी संकेत गोस्वामी यांच्या पथकाने ११ रोजी अचानक धाड टाकली. या धाडीत रेती उत्खनन करणाऱ्या दोन जेसीबी यंत्रांसह रेती वाहतूक करणारी पाच वाहणे आढळुन आल्याचे नमूद केले.

आहे. पकडण्यात आलेल्या वाहन चालकाकडे वाहतूकीचा परवाना आहे की नाही? याची चौकशी करण्यात येत आहे. सर्व वाहनांच्या चौकशीनंतर पोलीस प्रशासनाच्या वतीने पुढील कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती प्राप्त झाली



आहे. विशेष म्हणजे देगलूरच्या पथकाने टाकलेल्या या धाडीत दोषी असणाऱ्यांवर पोलीस प्रशासनाच्या वतीने काय कारवाई होणार? याकडे लक्ष लागून आहे. काही दिवसांपूर्वीच तालुक्यातील कुंडलवाडी पोलीस स्थानकातील दोन पोलीस अधिकाऱ्यांना रेतीच्या प्रकरणातच लाच घेताना पकडण्यात येऊन कारवाई झाली

होती हे विशेष होय. असेही सांगितल्या जाते की, पुढच्यास ठेच मागचा शहाणा, असे असले तरी अद्याप रेतीचा तस्करी व्यवसाय मात्र थांबल्याचे दिसून येत नाही.याप्रकरणी पोउपनि दिलीप मुंडे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून बिलोली पोलिसांनी गुन्हादाखल केला आहे. या पथकात उपविभागीय पोलिस अधीकारी देगलूरचे संकेत गोसावी, बिलोलीचे रफिक चाँदशेख यांच्या मार्गदर्शनाखाली पो. नि. संजय शिंदे, पोउपनि दिलीप मुंडे, पोहेकॉ. मारोती मुद्देमवार, आनंदा शिंदे, बाबारावबंडगर, शेख अन्वरवइतर कर्मचाऱ्यांचा समावेश होता.

आरोपी गणेश रामराव हिवराळे, जाकेरखान मिर्झाखान व इतर ट्रक व टिप्परचे चालक व मालक यांना ताब्यात घेतले असून तसेच दोन पोकलेनचे चालक व मालक, रेतीसह २३ टिप्पर व ट्रक, दोन पोकलेन असा एकुण ३ कोटी १५ लाख १४ हजार रूपयाचा मुद्देमाल जप्त केला.


## नवीन वर्षाच्या सुरुवातीला अधिक भारतीय प्रतिबंधात्मक आरोग्यसेवेची निवड करत आहेत

मुंबई दि.१३ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- नवीन वर्षाच्या सुरुवातीला आरोग्यदायी जीवनशैलीसाठी संकल्प केले जातात, परंतु यावेळी हा निर्धार प्रत्यक्ष कृतीत परिवर्तित होत आहे. हेल्थियन्स, जे घरी आरोग्य तपासणी सेवा पुरवणारी एक अग्रगण्य डायग्नोस्टिक कंपनी आहे, त्यांनी २०२५ च्या जानेवारी महिन्याच्या पहिल्या १५ दिवसांत, २०२४ च्या त्याच कालावधीच्या तुलनेत २३% अधिक तपासण्या केल्याचे नोंदवले आहे.

उच्च रक्तदाब, कोलेस्ट्रॉल, मधुमेह, थायरॉईड विकार आणि हायपरटेंशन यांसारख्या जीवनशैलीशी संबंधित आजारांमध्ये वाढ झाल्याने लोकांमध्ये आरोग्य जागरूकता वाढत आहे. त्यामुळे अधिकाधिक लोक प्रतिबंधात्मक आरोग्यसेवेकडे वळत असून, स्वतःच्या आरोग्याचे नियमित परीक्षण करून निरोगी जीवनशैलीकडे लक्ष देत आहेत. हेल्थियन्सचे संस्थापक दीपक साहनी म्हणाले की, ‘‘हेल्थियन्समध्ये आमचे ध्येय नेहमीच लोकांना वेळेवर आरोग्य तपासण्या करून स्वतःच्या आरोग्यावर नियंत्रण ठेवण्यास प्रवृत्त करणे आहे. आम्ही सध्या ज्या प्रमाणात तपासण्यांमध्ये वाढ पाहत आहोत, ती आरोग्यासंबंधी मानसिकतेतील सकारात्मक बदल दर्शवते. अधिकाधिक लोक आता स्वतःच्या आरोग्याला प्राधान्य देत आहेत आणि वेळेत निदान करण्याचे महत्त्व समजू लागले आहेत. आमचे उद्दिष्ट प्रत्येकाला सुलभ आणि परवडणारी आरोग्यसेवा उपलब्ध करून देणे आहे, जेणेकरून प्रत्येकजण निरोगी जीवन जगू शकेल.’’

## मानवत येथे सद् गूरू संत गजानन महाराज प्रकट दिन उत्साहाचे आयोजन

मानवत दि.१३ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- मानवत येथील श्री संत गजानन महाराज मंदिरा मध्ये संतश्रेष्ठ सदगूरू श्री संत गजानन महाराज यांच्या १४७ व्या प्रगट दिन उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या उत्सवातील कार्यक्रम श्रीची मानवत शहरातून भव्य शोभायात्रा नगर प्रदक्षिणा दिनांक १६ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ८ वाजता मानवत शहरातील भक्त संतोषजी काबरा यांच्या निवास स्थानापासून म्हणजे कटारी मारोती मंदिराच्या पाठीमागील ठिकाणा पासून ते गणपती विसर्जन मिरवणूक मार्गाने सद् गूरू श्री संत श्रेष्ठ गजानन महाराज मंदिरा पर्यंत काढण्यात येणार आहे. भव्य शोभायात्रा नंतर भाविक भक्तांना महाप्रसादाचे वाटप होईल तरी मानवत तालूक्याच्या पंचकोशितील भाविक भक्तांनी महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन संयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.



दिनांक १७,१८,१९ फेब्रुवारी रोजी सकाळी ७ ते ८ श्री चा लघुरुद्राभिषेक ८ ते १०:३० श्री विष्णू याग १०:३० ते ०१:३० श्री गजानन महाराज विजय ग्रंथाचे सामूहिक पारायण व त्यानंतर श्री ची महाआरती व महाप्रसाद श्री २० फेब्रुवारी रोजी सकाळी ७ ते ८:३० श्री चा लघुद्राभिषेक ९ ते १० श्री विष्णू याग पूर्णाहुती १० ते ०१:३० श्री श्री गजानन विजय ग्रंथाच्या प्रथम अध्यायाचे सामूहिक पारायण व ११ ते १२ या वेळेत श्री च्या चरित्रावर प्रवचन होणार आहे. हे प्रवचन श्री नरहरी शास्त्री जोशी एरंडेश्वरकर हे करणार आहेत.

तर दुपारी १२:०५ मिनिटांनी श्री चे प्राकट्य, श्री गजानन बावनी, महाआरती व नंतर महाप्रसाद होईल व रात्री ८ पर्यंत हा महाप्रसाद असेल. या सोहळ्यास सर्व भाविकांनी सहभागी व्हावे असे श्री संत गजानन महाराज संस्थान मानवत संयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

## पान १ वरून

### वक्फ बोर्ड दुरुस्ती विधेयकाचा...

पाल पुराव्याच्या नोंदीसह वक्फ अहवाल सादर केलाय. या अहवालाविरुद्ध विरोधकांनी आधीच असहमतीचे नोट्स सादर केले असल्याने दोन्ही सभागृहात गोंधळ सुरू आहे.

राज्यसभेत वक्फ विधेयकाबाबतच्या जेपीसी अहवालावर टीएमसी खासदार सुष्मिता देव म्हणाल्या, ‘‘जर तुम्ही पाहिले तर, त्यांनी आज सादर झालेल्या समितीच्या अहवालावरील असहमतीची नोंद काळ्या शाईने किंवा पांढऱ्या कागदाने अधोरेखित केली आहे. जर आपण या देशाला लोकशाही मानतो, तर प्रत्येकाचे मत महत्त्वाचे असले पाहिजे. तुम्ही आमचे मत कसे लपवू शकता? आम्ही आज राज्यसभेत त्याचा विरोध केलाय. वक्फ (दुरुस्ती) विधेयकावर विचार करणाऱ्या संयुक्त संसदीय समितीचा (जेपीसी) अहवाल राज्यसभेत गदारोळाच्या दरम्यान सादर करण्यात आलाय. विधेयकावर आक्षेप व्यक्त करताना मल्लिकार्जुन खरगे म्हणाले की, हे विधेयक योग्य नाही. हा एक बनावट अहवाल आहे. आम्ही हे स्वीकारणार नाही. खासदारांची मते दाबली गेली आहेत. खरगे म्हणाले की, हा अहवाल पुन्हा एकदा जेपीसीकडे पाठवावा. जेपी नड्डा यांनी हे पाऊल उचलले पाहिजे. आमच्या मतभेदांकडे दुर्लक्ष करण्यात आल्याचे खरगे म्हणालेत.

### राजन साळवी यांचा अखेर शिंदे...

अशी इच्छा राजन साळवी यांनी व्यक्त केली आहे.

यावेळी बोलताना उदय सामंत म्हणाले, साळवी साहेब आपण शिवसेना वाढवत असताना धनुष्यबाण घेऊनच शिवसेना वाढवली. मात्र, आता बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांच्या शिवसेनेचे धनुष्यबाण शिवसेनेकडेच ठेवण्याचे पवित्र काम एकनाथ शिंदे साहेब यांनी केले आहे. आपण एक कुटुंब म्हणून काम करतो आणि कुटुंब प्रमुख म्हणून एकनाथ शिंदे काम करतात. पूर्ण रत्नागिरी जिल्हा भगवामय करायचा आहे, मी तुम्हाला शब्द देतो की आपण सगळे मिळून हे काम करू असे सामंत म्हणाले.

### राज्यात जीबीएसचं थैमान!,...

मनपा, २९ रुग्ण पिंपरी-चिंचवड मनपा, ३१ रुग्ण पुणे ग्रामीण हद्दीतील आणि ८ रुग्ण इतर जिल्ह्यांमधील आहेत. सध्या ५२ रुग्ण अतिदक्षता विभागात उपचार घेत असून, २० रुग्ण व्हेंटिलेटरवर आहेत. आत्तापर्यंत १०९ रुग्णांना डिस्चार्ज देण्यात आला आहे.

खडकवासला भागातील ५९ वर्षीय पुरुषाचा जीबीएसमुळे मृत्यू झाला आहे. या रुग्णाला १० फेब्रुवारी रोजी नवले हॉस्पिटलमध्ये उपचारांसाठी दाखल करण्यात आलं होतं. रुग्णाला अशक्तपणा जाणवत होता आणि जागेवरून हलता देखील येत नव्हतं. एनसीव्ही तपासणी केल्यावर प्लाझ्मा फेरेसिसचे उपचार करण्यात आले. ११ फेब्रुवारी रोजी रुग्णाला कार्डिअॅक अरेस्टचा त्रास झाला. उपचारा दरम्यान त्यांचा पहाटे ३.३० वाजता मृत्यू झाला, असे मृत्यू अहवालात सांगण्यात आलं आहे.

### निर्मला सीतारमण यांनी लोकसभेत...

त्यांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी लक्षणीय कर कपात करण्यात आली आहे. निर्मला सीतारमण यांनी आपल्या अर्थसंकल्पीय भाषणात कर दायित्वांमध्ये लक्षणीय कपात करण्याची घोषणा केली. नवीन आयकर विधेयक कर भरण्याची प्रक्रिया सोपी आणि कमी बोजा देणारी आणि या बदलांवर आधारित असेल, त्यामुळे पगारदार व्यक्ती, छोटे व्यावसायिक आणि स्वयंरोजगार व्यावसायिकांना अधिक पारदर्शक कर प्रणालीचा फायदा होईल; ज्यामुळे कायदेशीर आवश्यकतांचे पालन करण्यासाठी लागणारा खर्च कमी होईल आणि फाइलिंगची प्रक्रिया अधिक सुलभ होईल.

### प्रसिद्ध शास्त्रीय गायक पंडित...

होती. पंडित प्रभाकर कारेकर यांचा जन्म १९४४ साली गोव्यात झाला होता. पंडित सुरेश हळदणकर, पंडित जितेंद्र अभिषेकी आणि पंडित सी.आर. व्यास यांच्याकडून त्यांनी शास्त्रीय संगीताचे धडे घेतले. पंडित प्रभाकर हे बोलावा विठ्ठल, पहावा विठ्ठल आणि वक्रतुंड महाकाय या सारख्या रचनांसाठी प्रसिद्ध होते. ते एक उत्कृष्ट गायक आणि उत्तम शिक्षक होते.

तानसेन सन्मान, संगीत नाटक अकादमी पुरस्कार, गोमंत विभूषण पुरस्कार यासह अनेक पुरस्कारांनी त्यांना सन्मानित करण्यात आले होते. कारेकर यांनी ऑर्नेट कोलमन आणि सुलतान खान यांच्यासोबत फ्यूजन संगीतातही हात आजमावला होता.

### परळीच्या फौजदारी न्यायालयाची...

आदेश दिल्याचे तक्रारदाराचे वकील चंद्रकांत ठोंबरे यांनी म्हटले आहे.

फौजदारी न्यायालयामध्ये धनंजय मुंडे यांनी यांना कारणे दाखवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. याप्रकरणी २४ फेब्रुवारी न्यायालयात सुनावणी होणार असल्याचे देखील तक्रारदाराच्या वकिलांनी सांगितले आहे. करुणा मुंडे यांनी याबाबत तक्रार अर्ज केलेला होत. या अर्जात निवडणूक उमेदवारी भरताना खरी माहिती दडवण्याचा आरोप आहे. धनंजय मुंडे यांनी राजश्री मुंडे आणि तीन मुली तसेच करुणा मुंडे यांच्या दोन मुलांचा उल्लेख केला होता. मात्र करुणा मुंडे यांच्या नावाच्या मिळकतीबाबत कुठलाही उल्लेख केला नव्हता. या आरोपाखाली हा अर्ज करण्यात आला होता. यावरच कोर्टाने मंत्री धनंजय मुंडे यांना कारणे दाखवा नोटीस बजावली आहे.

### मराठा आंदोलक म्हणून....

देऊन उपयोग नाही. आता महाराष्ट्रभर ही समिती गेली पाहिजे. समितीने नोंदी शोधल्या पाहिजे. समितीला बसण्यासाठी कक्ष दिले पाहिजे. त्यांना निधी कमी पडता कामा नये. सगळ्या व्हॅलिडिटी झाल्या पाहिजे. जे प्रमाणपत्र रोखून धरले ते तात्काळ दिले पाहिजे. शासनाने हैदराबाद गॅझेट लागू करतो, असे सांगितले आहे. बॉम्बे गव्हर्मेंट आणि सातारा संस्थान हे आता शिंदे समितीकडे आहे. सरकार त्याच्यावर अभ्यास करणार आहे. गॅझेटचा अभ्यास शिंदे समितीने केलेला आहे. आता सरकारला करायचा आहे. त्यामुळे गॅझेटच्या अंमलबजावणीची वाट आम्ही आता पाहत आहोत, असे मनोज जरांगे पाटील म्हणाले.

१५ तारखेपासून उपोषणाचे आमचे ठरले होते. त्यामुळे गावकऱ्यांशी चर्चा करणार आहे. त्यानंतर त्या संदर्भात निर्णय जाहीर करू. परंतु आता मागण्या मान्य करायला लागले म्हणून आम्ही बोलणार नाही. फक्त तुम्ही खोटे करू नका, हे आमचे मागणे आहे. तुम्ही मराठा आंदोलन म्हणून कुणालाही नोटीस नाही देऊ शकत नाही. त्यांच्यावर दुसरे काही प्रकरण असेल तर ठीक आहे. परंतु मराठा आंदोलन म्हणून खपवून घेणार नाही, असा इशारा मनोज जरांगे पाटील यांनी दिला.

### संजय राऊत शरद पवारांकड....

ही उध्दव ठाकरे यांना राजकीय कानफटात आहे. अशा अनेक कानफटात त्यांना खायच्या आहेत असंही कदम म्हणाले. राज्यातील अनेक नेते पक्ष प्रवेशासाठी रांगेत उभे आहेत. उध्दव ठाकरे यांच्या सोबत कोणीही राहणार नाही. शेवटी हम दो हमारे दो अशी परिस्थिती येईल असा टोला देखील रामदास कदमांनी लगावला. राजन साळवी यांनी उध्दव ठाकरे यांचा चेहरा उघडा पाडला असेही ते म्हणाले. ही फक्त नांदी आहे. अजून खूप काही बाकी आहे असे रामदास कदम म्हणाले.

शेवटपर्यंत सोबत राहिले पण उध्दव ठाकरे यांच्याकडेच सगळ संपत आहे हे राजन साळवी यांच्या लक्षात आलं आहे. उध्दव ठाकरेंनी बाळासाहेब ठाकरे यांच्या पाठीत खंजीर खुपसला हे महाराष्ट्राला कळल्याचे रामदास कदम म्हणाले. राजन मला माझ्या भावाप्रमाणे आहे. यापूर्वी मी त्याला फोन केला असता तर तो कधीच आला असता असेही रामदास कदम म्हणाले. वैभव नाईक यांच्याशी देखील माझे चांगले संबंध असल्याचं रामदास कदम यांनी सांगितलं.

### उद्धव ठाकरे यांच्या पक्षाकडून...

पत्रकारांशी बोलताना संजय राऊत म्हणाले होते की, ‘‘राजकारणात काही गोष्टी टाळल्या पाहिजेत. शरद पवारांनी शिंदेंचा सन्मान केला नाही, तर अमित शहांचा सन्मान केला असल्याची आमची भावना आहे. ज्या व्यक्तीला आपण महाराष्ट्राचे शत्रू मानतो त्याला असा सन्मान देणे म्हणजे महाराष्ट्राचा अभिमान दुखावणारे आहे. पवारांनी वेगळा विचार केला असेल, पण महाराष्ट्रातील जनतेला असे राजकारण आवडलेले नाही. आम्हाला तुमचे दिल्लीचे राजकारण कळत नाही, पण आम्हाला राजकारण कळते. अशा शब्दात राऊत यांनी शरद पवारांवर टीका केली होती.

राष्ट्रवादी शरदचंद पवार पक्षाचे खासदार अमोल कोल्हे यांनी यावर प्रत्युत्तर देखील दिले आहे. ते म्हणाले की, राऊत त्यांचे वैयक्तिक मत व्यक्त करत आहेत. राष्ट्रीय राजधानीतील हा कार्यक्रम अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचा भाग असल्याचे त्यांनी सांगितले. कोल्हे म्हणाले की, ‘‘प्रत्येक गोष्टीत राजकारण आणले जात नाही अशा नेत्याची भूमिका त्यांनी बजावली. यात काही गैर आहे असे मला वाटत नाही. कार्यक्रमाचे स्वागत समिती अध्यक्ष हे शरद पवार आहेत. तर आमदार रोहित पवार म्हणाले की, राऊत यांची प्रतिक्रिया आश्चर्यकारक आहे, कारण महाराष्ट्राला यशवंतराव चव्हाण आणि बाळासाहेब ठाकरे यांच्यासारख्या सभ्य राजकीय नेत्यांची परंपरा आहे. शरद पवारांनी ही परंपरा पुढे नेली आणि राजकीय मतभेदांना कधीही सामाजिक-सांस्कृतिक कार्यक्रमात अडथळा येऊ दिला नाही.

पवारांनी शिंदे यांचा सन्मान केल्याबद्दल राऊत यांनी केलेल्या टीकेला प्रत्युत्तर दिले आहे. भाजपचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, शरद पवार यांनी एका प्रकारे उद्धव ठाकरेंपेक्षा मुख्यमंत्री म्हणून शिवसेनाप्रमुख एकनाथ शिंदे यांनी चांगले काम केले आहे याला दुजोरा दिला आहे. ठाकरे मुख्यमंत्री असताना २०१९ ते २०२२ या कालावधीत केवळ दोनदा मंत्रालयाला भेट दिल्याचे पवारांनी त्यांच्या आत्मचरित्रात नमूद केले आहे, असा दावा भाजप नेत्याने केला आहे. याउलट शिंदे यांनी मुख्यमंत्री असताना २२ तास काम केले. या संबधी बावनकुळे म्हणाले की, ठाकरेंनी राज्याचे नुकसान केले हे समजायला पवारांना वेळ लागला, तर शिंदे यांनी राज्याला प्रगतीच्या वाटेवर नेले आहे.

### ६५ वर्षांवरील रिक्षा चालकांना...

महाराष्ट्र ऑटो-रिक्षा मीटर्स टॅक्सी चालक कल्याणकारी महामंडळ, असं त्याचं नाव असणार आहे. आम्ही लोगोचं प्रकाशन सुद्धा मार्च महिन्यात करणार आहोत. कारण आमचा परिवहन दिवस असतो, त्यादिवशी मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांच्या उपस्थित कार्यक्रम पार पडेल.

पुढे बोलताना प्रताप सरनाईक म्हणाले, ठाण्यात मुख्य कार्यालय धर्मवीर आनंद दिघे यांच्या नावाने हे मंडळ स्थापन झाले. २७ जानेवारी हा वर्धापनदिन असेल. ५० कोटी रुपयाची भरघोस तरतूद करण्यात आली आहे. लोगोचं प्रकाशन १ मार्च रोजी करणार आहोत. परिवहन मुख्य कार्यालयात भूमिपूजन मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्या हस्ते उद्घाटन होईल. राज्यातील एक लाखापेक्षा रिक्षा चालकांना याचा फायदा होईल. त्यांच्यासाठी वेगळी बँक निर्माण करण्याचा मानस आहे. याचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना देणार आहोत. प्रत्येक जिल्ह्यात याचा फायदा होईल. मंडळाचे ५०० रुपये भरून सभासद सदस्य होण्यासाठी भरावे लागतील. वर्षाला ३०० रुपये फी देखील द्यावी लागेल. बोगस रिक्षा चालकांना कठोर कारवाई केली जाईल. सर्वांनी नोंदणी केली तर ६७ कोटी रुपयांपेक्षा अधिक पैसे येतील.

# १५ व १६ फेब्रुवारीला वाळूज येथे रंगणार मराठवाडा साहित्य संमेलन

छत्रपती संभाजीनगर दि.१३ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- विजय शिक्षण प्रसारक मंडळ संचलित दगडोजीराव देशमुख महाविद्यालय (रौप्य महोत्सवी वर्ष २०२५) तर्फे मराठवाडा साहित्य परिषदेच्या ४४ वे मराठवाडा साहित्य संमेलनाचे आयोजन वाळूज येथील विलासराव देशमुख साहित्यनगरी, दगडोजीराव देशमुख महाविद्यालय बजाजनगर येथे शनिवार १५ व रविवार १६ फेब्रुवारी २०२५ रोजी आयोजित करण्यात आले आहे. संमेलनामध्ये साहित्य रसिकांसाठी विविध साहित्यिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. डॉ. भीमराव वाघचौरे हे संमेलनाध्यक्ष तर विजय राऊत हे संमेलनाचे स्वागताध्यक्ष असणार आहेत.

शनिवार दिनांक १५ रोजी सकाळी १०. ३० ते १. ०० या वेळेत क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले विचारपिठावर संमेलनाध्यक्ष तथा सुप्रसिद्ध कादंबरीकार मा.डॉ. भीमराव वाघचौरे यांच्या प्रमुख उपस्थितीत मा.ना. उदय सामंत (मंत्री मराठी भाषा विभाग व उद्योग महाराष्ट्र राज्य यांच्या हस्ते संमेलनाचे उदघाटन होईल. यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणून मा.ना. संजय शिरसाट (मंत्री, सामाजिक न्याय तथा पालकमंत्री छत्रपती संभाजीनगर), मा.ना. अतुल सावे (मंत्री इतर मागास बहुजन कल्याण, महाराष्ट्र राज्य), मा.आ. अमित विलासराव देशमुख (माजी मंत्री, वैद्यकीय शिक्षण, महाराष्ट्र राज्य) हे मान्यवर उपस्थित राहतील. उदघाटन कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. समाधान इंगळे हे करतील तर आभार प्राचार्य डॉ. राहुल हजारे हे मानतील. तत्पूर्वी शनिवार



दिनांक १५. रोजी सकाळी ८:३० वाजता ग्रंथदिंडी काढण्यात येईल. उद्घाटक म्हणून मा. चेतन राऊत (अध्यय, मासिआ) हे असतील. सकाळी १० वाजता मा.डॉ. जगदीश कदम (संमेलनाध्यक्ष, ४३ वे मराठवाडा साहित्य संमेलन, गंगापूर) यांच्या हस्ते ग्रंथ प्रदर्शन उद्धाटन होईल.

यानंतर कार्यक्रमांना प्रारंभ होईल. यामध्ये क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले विचारपिठावर दुपारी २.०० ते ४.०० या वेळेत सामाजिक अस्वस्थते मागील खदखद, जातीची की मातीची? या विषयावर परिसंवाद - १ होईल. यामध्ये अध्यक्षस्थानी डॉ. साहेब खंदारे (परभणी) हे असतील. तर डॉ. मुस्तजीब खान (छत्रपती संभाजीनगर), उत्तम बावस्कर (छत्रपती संभाजीनगर), डॉ. राजेंद्र गोणारकर (नांदेड), डॉ. दलाहरी होनराव (लातूर), डॉ. शैलजा वरूरे (अंबाजोगाई), डॉ. दुष्यंत कटारे हे यामध्ये सहभागी होतील. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. रमेश औताडे हे करतील.

यानंतर दुपारी २.०० ते ४.०० या वेळेत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विचारपिठावर मराठवाड्यातील साहित्य नवे भान, नव्या वाटा ! या विषयावर परिसंवाद-२ होईल. अध्यक्षस्थानी डॉ. वसंत बिरादार (अहमदपूर) हे असतील. यामध्ये डॉ. महेश खरात (वैजापूर), डॉ. वैजिनाथ अनमुलवाड (नांदेड), डॉ. मुंजाभाऊ धोंडगे (सोनपेठ), प्रा. सुरेंद्र पाटील (लामजना), डॉ. रमेश रावळकर (छत्रपती संभाजीनगर) हे सहभागी होतील. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. जयप्रकाश चोरघडे हे करतील. दुपारी ४ ते १ या वेळेत क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले विचारपिठावर भारतीय संविधान या विषयावर परिचर्चा होईल. यामध्ये डॉ. प्रल्हाद लुलेकर (छत्रपती संभाजीनगर), ॲड. राज कुलकर्णी (धाराशिव), ॲड. सुषमा अंधारे (मुंबई), मुक्ता कदम (पुणे) हे सहभागी होतील. संवादक म्हणून श्रीरंजन आवटे, राहुल कोसंबी हे काम पाहतील. दुपारी ४ वाजता राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विचारपिठावर परिसंवाद-३ अंतर्गत सामाजिक अधोगतीला संत विचारच तारेल ! या विषयावर परिसंवाद होईल. अध्यक्षस्थानी प्रा. राम रौनेकर (जालना) हे असतील तर मार्तंड कुलकर्णी (किनवट), रवींद्र केसकर (धाराशिव), डॉ. सोपान सुरवसे (बीड), अनिल देशमुख (पैठण), डॉ. रूपेश मोरे (कन्नड) हे सहभागी होतील. सूत्रसंचालन गणेश घुले (छत्रपती संभाजीनगर) हे करतील.

## शुक्रवारी पंडीत दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा

छत्रपती संभाजीनगर दि.१३ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- कौशल्य विकास,रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या वतीने पंडीत दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा, श्रीनाथ कॉलेज ऑफ फार्मसी, हायटेक महाविद्यालय परिसर, एम.आय.डी.सी. वाळूज येथे शुक्रवार दि.१४ रोजी सकाळी साडेनऊ वा. आयोजित करण्यात आला आहे. यामध्ये छत्रपती संभाजीनगर येथील नामांकीत कंपनीचे प्रतिनिधी उपस्थित राहुन मुलाखती घेणार आहेत, असे सहायक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, छत्रपती संभाजीनगर यांनी कळविले आहे. या रोजगार मेळाव्यामध्ये वोखार्ड रिसर्च सेंटर, रत्नप्रभा मोटर्स, फोर्ब्स प्रेसीशन टूल्स अॅड मशिन पार्ट्स., लिभेर अप्लायंन्सेस प्रा.लि., अलंकार ग्रूप, ग्रीव्हज कॉटन प्रा.लि., वोखार्ड लि., पॅरासन मशीनरी इं. प्रा.लि., नवभारत फर्टीलायझर्स लि, एक्सेल प्लेसमेंट, पगारीया ऑटो, देवगीरी नागरी सहकारी बँक लि., अजंता फार्मा लि., सवेरा फार्मा, मायलन लॅबोरेटरी लि. इ. नियोक्ते उमेदवारांच्या मुलाखती घेणार आहेत.

कोणत्याही शाखेची पदवी, इंजिनीअरींग, डिप्लोमा, आय टी आय, एच एस सी, एस एस सी उतीर्ण इत्यादी पात्रताधारक उमेदवारांसाठी रोजगाराची साधारणपणे ५८८ पदे उपलब्ध असून विविध शैक्षणिक व व्यावसायीक पात्रतेनुसार रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत.

या मेळाव्यात सहभागी होण्यासाठी विभागाच्या संकेतस्थळावर उपलब्ध रिक्तपदांना एम्प्लॉयमेंट नोंदणी असलेल्या उमेदवारांनी युजरआयडी व पासवर्ड ने लॉग इन होऊन ऑनलाईन अप्लाय करावे आणि मुलाखतीसाठी उपस्थित राहावे.

संकेतस्थळावर नोंदणी करताना अथवा रिक्तपदासाठी अप्लाय करताना काही अडचण आल्यास कार्यालयाच्या दुरध्वनी क्रमांक ०२४०-२९५४८५९ वर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा. इच्छुक उमेदवारांनी दि.१४ रोजी सकाळी साडेनऊ वा. उपस्थित राहून पात्रतेप्रमाणे विविध नियोक्त्यांकडे मुलाखती देवून रोजगार संधीचा लाभ घ्यावा,असे आवाहन सहायक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, छत्रपती संभाजीनगर यांनी केले आहे.

## महाराष्ट्र शासन, उपवने व उद्याने यांचे ४५ सावे पुष्पप्रदर्शन उत्साहात संपन्न

छत्रपती संभाजीनगर दि.१३ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- महाराष्ट्र शासन उपवने व उद्याने सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग छत्रपती संभाजीनगर या विभागातर्फे आयोजित केलेल्या ४५ व्या वार्षिक पुष्प प्रदर्शनाचे उद्घाटन श्रीनिवास र .कातकडे मुख्य अभियंता सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग संभाजीनगर यांच्या शुभहस्ते करण्यात आले. या पुष्पप्रदर्शनामध्ये ९७५ प्रवेशिका नोंदवण्यात आलेल्या होत्या एकूण ७९ स्पर्धकांनी यामध्ये सहभाग नोंदवलेला होता .

जुने उच्च न्यायालयाच्या आवारात आयोजित केलेल्या पुष्पप्रदर्शनात गुलाब पुष्पे, मोसमी व वार्षिक फुले , शोभिवंत झाडे , कॅक्टस , सेक्युलंट लँडस्केप , ऑन द स्पॉट उद्यान स्पर्धा , विद्यार्थी व सर्वांसाठी पुष्परचना आणि रांगोळी स्पर्धा घेण्यात आलेल्या होत्या. यामध्ये सामान्य उद्योग उद्यान प्रेमी , नागरिक विद्यार्थी ,



रोपवाटिका कारखानदार , शासकीय व खाजगी संस्था यांनी सहभाग घेतलेला होता.

प्रदर्शनाचे मुख्य आकर्षण म्हणजे गुलाब राजा गुलाब राजकुमारी हा बहुमान केंब्रिज स्कूल यांच्या गुलाब पुष्पास मिळाला. तर गुलाब राणी व गुलाब राजकुमाराचा बहुमान इंड्यूरन्स कॉस्टिंग लिमिटेड यांना मिळाला. सर्वात जास्त गुण मिळवून इंड्यूरन्स टेक्नॉलॉजी कॉस्टिंग डिव्हिजन लिमिटेड संभाजीनगर यांना मिळाला. तर केंब्रिज स्कूल यांना उपविजेत्या पदाची ट्रॉफी देण्यात आली.

पुष्पप्रदर्शनासाठी परीक्षक म्हणून विजय रावळ , संचालक उपवने व उद्याने मुंबई , संदीप जाधव सहाय्यक संचालक निवृत्त सहाय्यक संचालक , श्री पवार. श्री बामणीकर. सुनील चव्हाण, डॉक्टर परदेशी , डॉक्टर अनिल भुक्तार , डॉक्टर राकेश जाधव , डॉक्टर बनसोडे , श्रीमती डॉक्टर विना माळी , श्रीमती डॉक्टर वैशाली कोहाळे, निवृत्त प्राध्यापक माया वंजारी , श्री. भडके माजी उद्यान अधीक्षक यांनी परीक्षण केले.

सायंकाळी मोठ्या उत्साहात बक्षीस समारंभ संपन्न झाला. विजय रावळ संचालक उपवने व उद्याने मुंबई एस. जी. केंद्रे कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग पश्चिम संभाजीनगर यांच्या शुभहस्ते पार पडण्यात आला. पुष्पप्रदर्शन , पुष्परचना , फुलांच्या रांगोळ्या , पाहण्यासाठी संभाजीनगर व आजूबाजूच्या परिसरातील नागरिकांनी व पुष्प प्रेमींनी खूप गर्दी केलेली होती .

या पुष्पप्रदर्शनाला यशस्वी करण्यासाठी जे.व्ही चौगुले सहाय्यक संचालक उपमने व उद्याने संतोष तु. जाधव उद्यान अधीक्षक , श्री एस. टी.काळे तसेच नरहरी मुंडे व शंकर मोरे यांनी विशेष परिश्रम घेतले.



## आलेली संकटे माणसाला आत्मपरीक्षणाची संधी देतात, पंढरीनाथ महाराज पगार यांचे प्रतिपादन

लोणी खुर्द दि.१३ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर संकटे येतात आणि माणसाला आत्मपरीक्षण करण्याची संधी देतात, असे प्रतिपादन शिवाई संस्थानचे अध्यक्ष पंढरीनाथ महाराज पगार यांनी केले.

नागवाडी, तलवाडा येथे श्री नागेश्वर महादेव मंदिर मूर्ती प्राणप्रतिष्ठा व कलशारोहण सोहळ्यानिमित्त शिवाई संस्थानचे अध्यक्ष पंढरीनाथ महाराज पगार यांचे कीर्तन झाले. यावेळी शंकर स्वामी संस्थानचे अध्यक्ष सारंगधर महाराज भोपळे, सर्वानंदगिरी महाराज, चांगदेव महाराज, तातेराव मगर, अण्णा महाराज, योगेश महाराज, वैशाली बोरनारे, संजय निकम, सुरेश तांबे, भागीनाथ मगर, राजेंद्र मगर, उत्तमराव निकम, रिखब पाटणी यांची प्रमुख उपस्थिती होती. पगार महाराज म्हणाले, नाग जमातीचे लोक भारताचे नागरिक आहेत. त्यांची वस्ती प्रामुख्याने नागालँड प्रांतात आहे. अनंत, वासुकी, शेष, पद्मनाभ, कम्बल, शंखपाल, धृतराष्ट्र, तक्षक आणि कालिया या नऊ प्रकारच्या नागांच्या नावांचा किंवा जातींचा उल्लेख आहे. नागपंचमीचा दिवस नागदेवतेच्या पूजेला समर्पित आहे. धर्मशास्त्रात आठ नागांचे वर्णन केले आहे. यातील काही साप भगवान शंकराला अतिशय प्रिय आहेत. हिंदू धर्मात सापांना पूजनीय मानले गेले आहे. भगवान शिवाने गळ्यात नाग धारण केला आहे. ज्यामध्ये भगवान विष्णू शेषशय्येवर विसावले आहेत. कृष्ण अवतारात या शेषाने बलरामाचे रूप घेतले आहे आणि मोठा भाऊ म्हणून कृष्णाचे संगोपन केले आहे. अशी विविध भूमिका बजावणारे शेष नाग यांच्याप्रति कृतज्ञता म्हणून नागवाडी येथे नागेश्वर महादेव मंदिराची प्राणप्रतिष्ठा केली आहे.

## राज्यस्तरीय मूकनायक पुरस्काराचे रविवारी वितरण सोहळ्यास बहुसंख्येने उपस्थित राहा-प्रा.शरद वंजारे

छत्रपती संभाजीनगर दि.१३ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या मूकनायक या पाक्षिकामागील सामाजिक जाणीव आणि बांधिलकी जपणाऱ्या पत्रकारितेचा वारसा जतन करण्यासाठी मराठवाड्यातील शाक्यमुनि प्रतिष्ठानने यंदा राज्यस्तरीय मूकनायक पुरस्कार सुरू केला आहे. पहिल्या वर्षातील या प्रतिष्ठेच्या पुरस्कारासाठी ज्येष्ठ पत्रकार दिवाकर शेजवळ यांची निवड करण्यात आली आहे. रविवारी १६ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ११ वाजता पी.ई.एस. अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या अशोका हॉल येथे आयोजित कार्यक्रमात दिवाकर शेजवळ यांना राज्यस्तरीय मूकनायक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. समारंभाला वडाळा येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर लॉ कॉलेजचे प्राचार्य ॲड. जयमंगल धनराज, ग्रामिण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक अशोक सिरसे, पी. ई.एस.अभियांत्रीकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अभिजित वाडेकर, पत्रकार विजय बहादुरे यांची प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत.

दिवाकर शेजवळ हे गेली ३५ वर्षे पत्रकारिता करीत असून मुंबई मराठी पत्रकार संघाचे कार्यकारिणी सदस्य आहेत. या पुरस्काराचे स्वरूप २५ हजार रुपये रोख, मानपत्र आणि स्मृतिचिन्ह असे आहे.

या निवडीची घोषणा नुकतीच छत्रपती संभाजीनगर येथे झालेल्या बैठकीनंतर शाक्यमुनि प्रतिष्ठान चे अध्यक्ष प्रा. शरद वंजारे, उपाध्यक्ष प्रा.दिपक जमधाडे आणि सचिव प्रा. डॉ. संजय कांबळे यांनी एका पत्रकाद्वारे केली आहे.

## सेवा हक्क कायदा मध्ये सुविधा बाबत कर्मयोगचा भावनेतून करा-डॉ.किरण जाधव

छत्रपती संभाजीनगर दि.१३ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- अधिकाऱ्यांनी सेवा हक्क कायदा अंतर्गत देण्यात येणाऱ्या सुविधा कर्मयोगाच्या भावनेतून द्यावे, असे प्रतिपादन आयुक्त महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, डॉक्टर किरण जाधव यांनी आज छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका येथे आयोजित आढावा बैठकीत केले.




लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ अंतर्गत अधिसूचित करण्यात आलेल्या सेवांची अमलबजावणी करिता त्यांनी महापालिकेत बैठक घेतली. सदरील बैठकीत त्यांनी सदरील कायदा अमलबजावणी आणि मूल्यमापन बाबत दिशा निर्देश दिले.

या बैठकीत अतिरिक्त आयुक्त रणजीत पाटील, उप आयुक्त लखीचंद चव्हाण, राहुल सूर्यवंशी, अंकुश पांढरे, सर्व विभाग प्रमुख शाखाप्रमुख वार्ड अधिकारी व इतर अधिकारी कर्मचारी तसेच राज्य सेवा हक्क आयुक्त कार्यालयातील पदम परदेशी कक्ष अधिकारी, प्रकाश कांबळे तसेच विलास टरके उपस्थित होते. यांची उपस्थिती होती. मार्गदर्शन करताना डॉक्टर किरण जाधव म्हणाले की सेवा हक्क कायद्याच्या उद्दिष्ट नागरिकांना कार्यालयात न बोलवता सुविधा उपलब्ध करून देणे हा आहे. ते म्हणाले की अधिसूचित सेवा मोबाईल मार्फतच नागरिकांना भेटली पाहिजे.

विभाग प्रमुखांनी या कायद्याची प्रभावीपणे अंमलबजावणी व्हावे यासाठी त्यांच्या अधिपत्याखालचे कर्मचाऱ्यांचे गोपनीय अहवाल लिहिताना देखील अधिसूचित सेवेत संबंधित कर्मचारी ची कशी भूमिका आहे याची नोंद घ्यावी, ते म्हणाले.

याशिवाय या सेवांची यादी आणि प्रथम व द्वितीय अपिलीय अधिकारी यांची यादी मनपा मुख्यालयात लावण्यास त्यांनी सूचना केली. यावेळी त्यांनी सेवा हक्क अधिनियम अधिकाऱ्यांना समजावून सांगितले आणि त्यांची शंकांचे निवारण देखील केले. यावेळी त्यांनी अधिकाऱ्यांचे प्रश्नांचे समाधानकारक उत्तरही दिले.

## सामाजिक वनीकरण विभागाचा उपक्रम; वृक्ष उत्पादक व खरेदीदार मेळाव्यात ४४९ जणांचा सहभाग

छत्रपती संभाजीनगर दि.१३ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- सामाजिक वनीकरण विभागाच्या वतीने मंगळवारी (दि.१२) संत एकनाथ रंगमंदीर येथे वृक्ष उत्पादक आणि वृक्ष खरेदीदार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. या मेळाव्यात ४४९ जणांनी सहभाग घेतला.

जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्या हस्ते या मेळाव्याचे उद्धाटन करण्यात आले. वृक्ष लागवडीला चालना देऊन शेतकऱ्यांना त्याद्वारे उत्पन्न मिळावे हा हेतू या मागे होता. तथापि, वृक्ष लागवड होऊन पर्यावरणाचे संवर्धन होणे हा मुख्य हेतू होता.

वृक्ष शेतीचा मार्ग अवलंबून पर्जन्यमानावर अवलंबून असलेल्या शेतीतील उत्पन्नाची शाश्वतता टिकवणे तसेच पर्यावरणाचे संतूलनही टीकवणे हा या आयोजनामागील उद्देश होय. कोणताही व्यवसाय हा किमान किफायतशीर हवा हे बाजाराचे सूत्र आहे. त्यासाठी वृक्ष लागवड करणारे शेतकरी आणि त्या वृक्ष शेतीतून मिळणारे उत्पन्नाला उपलब्ध असणारी बाजारपेठ याचा समन्वय या आयोजनातून घालून देण्यात आला. विभागीय असणाऱ्या मेळाव्यात छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील २०७, जालना जिल्ह्यातील ६३, परभणी जिल्ह्यातील ५५, हिंगोली जिल्ह्यातील ३७ असे एकूण ३६२ वनशेती करणारे शेतकरी सहभागी होते. तर उर्वरीत वृक्ष खरेदीदार कंपन्यांचे संचालक व शासकीय प्रतिनिधी उपस्थित होते.

मिट्कॉन नेचर बेस्ड सोल्युशन्सचे भगतसिंग शेळके,जे.के.पेपर लि. चे संदीप घाटे, नेटीव्ह कोनबॅक बांबू प्रोड्क्टसचे संजीव करपे, इंदुराव सँडल प्रोडक्ट्सचे राजेंद्र गाडेकर, महाराष्ट्र बांबू विकास मंडळाचे सी.यु. मराडे, फळ संशोधन केंद्राचे वरिष्ठ शासत्रज्ञ डॉ. संजय पाटील इ. तज्ज्ञ व महाराष्ट्र बांबू विकास मंडळ, नागपूर, जैन टिश्यु कल्चर, जैन हायटेक प्लांट फॅक्ट्री, जैन इरिगेशन सिस्टीम्स लि., जैन ठिबक, जैन सोलार, ग्रीन सेन्स एनर्जी सिस्टीम्स, ग्रीन सेन्स सोलार वॉटर हिटर, महात्मा गांधी मिशन कृषी विज्ञान केंद्र, गांधेली अशा विविध संस्थांनी आपले स्टॉल्सही या कार्यक्रमात आणले होते.

कृषी विभागाच्या कृषी वानिकी योजना, बांबू उद्योगातील संधी, पेपर उद्योगातील संधी, चंदन शेती व बाजारपेठेतील संधी, वृक्ष लागवड, बाजारपेठ व निर्यात संधी अशा विविध विषयांवर तज्ज्ञांनी उपस्थित शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. तएच केशर आंबा गुणवत्ता केंद्र हिमायत बाग , एमजीएम च्या गांधेली येथील कृषी विज्ञान केंद्रास शेतकऱ्यांनी क्षेत्रभेटीही दिल्या. विभागीय वनअधिकारी सामाजिक वनीकरण श्रीमती कीर्ती जमदाडे कोकाटे यांच्या संकल्पनेतून हा अभिनव उपक्रम राबविण्यात आला. याद्वारे शाश्वत शेती आणि पर्यावरण संवर्धन अशा दोन्ही उद्दिष्टांची पूर्तता होण्याच्या दृष्टीने टाकलेले पहिले पाऊल नक्कीच चांगले पडले आहे.



# गोंदी पोलीस आणि आपुलकी बेघर निवारा केंद्राच्या माध्यमातून ताटातूट झालेल्या मनोरुग्णाला मिळाला कुटुंबाचा आधार



जालना दि.१३ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- मुलं चोरुन नेणारा चोरटा म्हणून नागरिकांनी एका परप्रांतीयाला पोलिसाच्या स्वाधीन केलं होतं. परंतु, पोलिसांनी केलेल्या तपासात तो मनोरुग्ण असल्याचं समोर आलं. त्यामुळे गोंदी सदरील मनोरुग्णाच्या नातेवाईकांचा शोध घेऊन मनोरुग्णाला नातेवाईकांच्या स्वाधीन केलं. त्यामुळे मनोरुग्णाला कुटुंबीयांचा आधार मिळाला आहे.

मागील १८ महिन्यापासून ओरिसा येथून बेपत्ता असलेल्या मनोरुग्णाला गोंदी पोलीस, स्थानिक गुन्हे शाखा पोलीस आणि आपुलकी शहरी बेघर निवारा केंद्राच्या वतीने आज त्याच्या कुटुंबीयांच्या स्वाधीन करण्यात आलय. विशेष म्हणजे लहान मुले पळवणारा व्यक्ती या अफवेतून शाहगड येथील नागरिकांनी पकडून त्याला गोंदी पोलिसांच्या स्वाधीन केलं होतं. मात्र गोंदी पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक आशिष खांडेकर यांच्या विशेष प्रयत्नातून ही व्यक्ती अखेर त्याच्या कुटुंबीयाकडे परत गेली आहे.

दोन दिवसापूर्वी शहागड येथील लहान मुलांना पळवणारा माणूस म्हणून तेथील नागरिकांनी एका व्यक्तीला ताब्यात घेऊन पोलिसांच्या स्वाधीन केलं होतं. मात्र पोलिसांनी चौकशी केल्यानंतर संबंधित व्यक्ती ही मनोरुग्न असून ती ओडिसा येथील असल्याच समोर आल होत. त्यानंतर सहायक पोलीस निरीक्षक आशिष खांडेकर यांनी ओरिसा येथील पोलिसांशी संपर्क साधला. ओरिसा येथील पोलिसांनी त्याच्या कुटुंबीयांशी संपर्क साधून दिल्यानंतर या मनोरुग्णाला जालना येथील आपुलकी शहरी बेघर निवारा केंद्र दाखल करण्यात आलं. विशेष म्हणजे या निवारा केंद्रात असतानाही त्याने पळून जाण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर आज दुपारी गोंदी पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक बालाजी पद्मने, स्थानिक गुन्हे शाखेचे रामप्रसाद पहुरे, सतीश श्रीवास यांनी आपुलकी शहरी बेघर निवारा केंद्र येथे धाव घेतली. त्यानंतर मनोरुग्ण असलेला मंगू बसंतीया याला त्याचे काका आणि भावाच्या स्वाधीन करण्यात आलं. यावेळी आपुलकी शहरी बेघर निवारा केंद्राचे संचालक अरुण सरदार आणि वैशाली सरदार यांची देखील उपस्थिती होती. ही कारवाई पोलिस अधीक्षक अजय कुमार बंसल, अप्पर पोलीस अधीक्षक आयुष नोपानी आणि स्थानिक गुन्हे शाखा पोलीस निरीक्षक पंकज जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

## नाट्यांकुरचा शुक्रवारपासून बालनाट्य महोत्सव!

### सुंदर कुँवरपुरियॉ : बालकलावंतांमध्ये उत्साह

जालना दि.१३ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- शालेय विद्यार्थ्यांसाठी हक्काची पर्वणी असलेल्या येथील नाट्यांकुर बालनाट्य संस्थेचा ४६ वा बालनाट्य महोत्सव दि. १४ ते १७ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत टाऊन स्थित डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात आयोजित करण्यात आला असून बालकलावंतांमध्ये उत्साह संचारला आहे.सर्वत्र बालनाट्य महोत्सवाची जय्यत तयारी सुरू असल्याची माहिती नाट्यांकुरचे सचिव सुंदर कुँवरपुरियॉ यांनी आज दिली.

बालनाट्य महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर सोमवारी ( ता. १०) डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात संघप्रमुखांची बैठक नाट्यांकुर चे अध्यक्ष धनराज जैन यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली.प्रकल्प प्रमुख आशीष रसाळ, जयेश पहाडे, सौ .रुपाली सेठ, सुनील शर्मा,मिलिंद दुसे यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

सुंदर कुँवरपुरियॉ यांनी अधिक माहिती देताना सांगितले की, शुक्रवारी (ता.१४) सकाळी ०९.३० वा. महोत्सवाचे उद्घाटन होईल. उद्घाटनानंतर शहरी प्राथमिक व ग्रामीण बालवाडी च्या समुह नृत्य, ग्रामीण प्राथमिक, ग्रामीण हायस्कूल विभागाच्या एकांकिका स्पर्धा होतील. शनिवारी ( ता. १५) सकाळी ०९.३० वा. शहरी प्राथमिक एकांकिका, ग्रामीण प्राथमिक समूह नृत्य ,हिंदी विभाग एकांकिका स्पर्धा, रविवारी ( ता. १६) सकाळी ०९.०० वा. ग्रामीण हायस्कूल समुहनृत्य ,शहरी हायस्कूल विभाग एकांकिका स्पर्धा होतील .असे नमूद करत सुंदर कुँवरपुरियॉ म्हणाले, सोमवारी ( ता. १७) सकाळी ०९.०० वा.शहरी हायस्कूल, व बालवाडी विभागाच्या समुह नृत्य स्पर्धा आणि शेवटी मनपा आयुक्त संतोष खांडेकर यांच्या शुभहस्ते पारितोषिक वितरण समारंभ होणार असल्याचे सुंदर कुँवरपुरियॉ यांनी सांगितले. अध्यक्षीय समारोपात धनराज जैन यांनी सूचना दिल्या .प्रास्ताविक व सुत्रसंचालन प्रकल्प प्रमुख आशीष रसाळ यांनी केले तर जयेश पहाडे यांनी आभार मानले. बैठकीस संघप्रमुखांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## श्री ढोकेश्वर महाविद्यालयातील मुलींची पोलीस दलात भरारी-डॉ.खिलारी



पारनेर दि.१३ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- श्री ढोकेश्वर महाविद्यालयातील चार मुली आणि एका विद्यार्थ्यांची निवड पोलीस दलात झाली ही महाविद्यालयाच्या दृष्टीने अतिशय कौतुकास्पद बाब आहे असे प्रतिपादन अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे कार्यकारिणी सदस्य डॉ.भाऊसाहेब खिलारी यांनी केले.

महाविद्यालयाच्या वतीने डॉ.खिलारी यांच्या शुभहस्ते पोलीस दलात भरती झालेल्या आचल गायकवाड, सुचिता उंडे , तृषाली राऊत ,सायली वाळुंज आणि सचिन मोरे यांचा सत्कार करण्यात आला यावेळी डॉ. खिलारी पुढे म्हणाले की महात्मा फुले यांनी मुलींच्या शिक्षणासाठी प्रथम शाळा सुरू केल्या याचाच परिणाम म्हणून शिक्षण व इतर सर्व क्षेत्रात मुली आज उच्च पदावर कार्यरत आहेत. मुलींप्रमाणेच मुलांनीही शिक्षण घेऊन अधिकारी बनावे असे आवाहनही त्यांनी केले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. लक्ष्मणराव मतकर यांनीही पोलीस दलात भरती झालेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन आणि कौतुक केले आणि श्री ढोकेश्वर महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी पोलिस दलात मारलेली भरारी ही महाविद्यालयाच्या दृष्टीने अतिशय अभिमानास्पद बाब आहे. अशाच प्रकारची प्रगती करून महाविद्यालयाचे, कुटुंबाचे आणि गावाचे नाव उज्वल करावे असे ही आवाहन प्राचार्य यांनी केले. पोलीस दलात भरती झालेल्या यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन संस्थेचे अध्यक्ष श्री.रामचंद्रजी दरे, उपाध्यक्ष डॉ. विवेक भापकर, सचिव ॲड. विश्वासराव आठरे पाटील, सहसचिव श्री जयंत वाघ, खजिनदार एड. दिपलक्ष्मी म्हसे पाटील, ज्येष्ठ विश्वस्त सिताराम खिलारी पाटील यांनी केले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील विद्यार्थी व प्राध्यापक बहुसंख्येने उपस्थित होते. प्रास्ताविक उपप्राचार्य प्रा.विरेंद्र धनशेट्टी यांनी केले तर आभार प्रा.लक्ष्मण कोठावळे यांनी मानले.

## जैन साधू-संतांसाठी लोकसहभागातून उभारणार त्यागी भवन

### संभवनाथ दिगंबर मंदिर वर्धापनदिनी संकल्प, छत्रपती सजैन समाजात




छत्रपती संभाजीनगर दि.१३ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- तीर्थकरांच्या भक्तीसोबतच साधूसंतांच्या सेवेला अनन्यसाधारण महत्त्व आहे. त्यामुळेच मंदिराइतकेच महत्त्व संतांसाठी त्यागी भवनला आहे. बजाजनगरातील संभवनाथ मंदिरात त्यागी भवन निर्माण केले जात आहे. संभवनाथ दिगंबर जैन मंदिराचा १३वा वर्धापनदिन साजरा करण्यात आला. या वेळी लोकसहभागातून त्यागी भवन उभारणीचा संकल्प करण्यात आला. यानिमित्ताने धर्म ध्वजारोहण मिरवणूक काढण्यात आली होती. संभवनाथ भगवंतांची मूर्ती पालखीत ठेवण्यात आली होती. गावाच्या राशीवरून ठरते तीर्थंकरांची स्थापना येथे तिसरे तीर्थकर भगवान संभवनाथ यांची स्थापना केली आहे. प्रत्येक मंदिरात कोणत्या तीर्थकरांची स्थापना होईल हे त्या गावाच्या राशीवरून ठरते. सुवीरसागर महाराजांनी ही स्थापना केली आहे, असे सचिव सुजित गोधा यांनी सांगितले. मूर्ती विराजमान करण्याचे मान अनिता महावीर कासलीवाल इंद्र इंद्राणी व शांति मंत्र श्रीमती संगीता, स्विटी कार्तिक गंगवाल. जल अभिषेक व दूध अभिषेक सो कल्पना डॉ दिलीप कुमार जी अक्षय चुडिवाल सर्व औषधी डॉ विशाल अजित काला अर्चना फल सुशीला अभय कुमारजी पापडीवाल मंगल आरती जीवन गंगवाल यान मिळाला यावेळी तुषार, विजय,सौ.कनकमाला, सौ.समता,यशस्वी, अधिराज साहुजी परिवार जामखेडकर व समस्त दिगंबर जैन समाज बजाजनगर यांच्या वतीने महाप्रसाद देण्यात येणार आला.

श्री विद्यासागर महाराज जी आरती व अघ चढायचे मान सम्यक गार्डन महिला मंडळ यांना मिळाला कायकम यशस्वी करयासाठी अध्यक्ष डॉ राजेंद काला, सचिव सुजित गोधा, उपाध्यक्ष अतुल चुडीवाल, कोषाध्यक्ष सुदेश अजमेरा, सदस्य दिपक काला, महावीर पाडे, सचिन पाटणी, योगेश कासलीवाल, सुनिल पांडे, जीवन गंगवाल खुशाल पाटनी नितीन शहा कैलास , यांच्यासह सल्लागार डॉ.सुरेश बडजाते,रविंद्र ठोले व सकल जैन समाज बजाजनगर, पंढरपुर, वाळुज, सिडको महानगर १ यांची केले असल्याची माहिती प्रचार प्रसार संयोजक नरेंद्र अजमेरा व पियुष कासलीवाल यांनी एका पत्रकाव्दारे दिली.

## मोटार सायकलच्या पसंती क्रमांकासाठी अर्ज करावेत

जालना दि.१३ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- सामान्य प्रशासन विभागाने तालुकास्तरीय लोकशाही दिनाचे आयोजन महिन्याचे तिसऱ्या सोमवारी करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुषंगाने तहसील कार्यालय जालना येथे तालुकास्तरीय लोकशाही दिन सोमवार दि. १७ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी १० ते १२ वाजेपर्यंत लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती तहसीलदार, जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे दिली आहे.

लोकशाही दिनासाठी अर्जदारांनी अर्ज विहीत नमुन्यात १५ दिवस आधी २ प्रतित पाठवणे आवश्यक आहे. या लोकशाही दिनामध्ये अर्ज देताना त्यांनी संबंधित तालुक्यातील तिसऱ्या सोमवारी तालुकास्तरीय लोकशाही दिनामध्ये अर्ज दिलेला असावा. या तालुकास्तरीय लोकशाही दिनात एक महिन्यापेक्षा जास्त कालावधी होवून देखील कोणतीही कार्यवाही झाली नाही अशाच अर्जदाराने टोकन क्रमांकाच्या पावतीसह विहीत नमुन्यात दोन प्रतीमध्ये अर्ज सादर करावा. तसेच ज्या अर्जदाराने तालुकास्तरीय लोकशाही दिनात भाग घेतला नाही अशा अर्जदाराचे अर्ज स्विकारले जाणार नाहीत. लोकशाही दिनात न्यायप्रविष्ट प्रकरणे, राजस्व व अपील, सेवाविषयक आस्थापना विषयक बाबी, विहीत नमुन्यात नसणारे व त्यासोबत आवश्यक त्या कागदपत्राच्या प्रती न जोडलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत. तालुकास्तरीय लोकशाही दिनातील टोकन क्रमांकाची तहसीलदार यांच्या स्वाक्षरीची पोच पावती व त्यासाठी दिलेल्या मुदतीत व नमुन्यात ज्यांनी या पुर्वीच्या आवश्यक कागदपत्रासह अर्ज केले असतील त्यांना तक्रार मांडता येईल तसेच ज्यांनी यापुर्वी जिल्हास्तरावरील लोकशाही दिनी तक्रार अर्ज दिलेला आहे. परंतू अद्याप कार्यवाही झालेली नाही, अशा तक्रारदारांनी पुन्हा अर्ज करू नये. लोकशाही दिन विहीत नमुन्याचा अर्ज https://jalna.nic.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. असेही कळविले आहे.

## भारतीय जैन संघटनेच्या जालना शहर अध्यक्षपदी राजेश लुनिया



जालना दि.१३ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- भारतीय जैन संघटनेच्या जालना शहर अध्यक्षपदी राजेश मंगलचंद लुनिया यांची नियुक्ती करण्यात आली आहे. जालना शहरात नुकत्याच पार पडलेल्या भारतीय जैन संघटनेच्या प्रदेश कार्यकारणी बैठकीत राष्ट्रीय अध्यक्ष नंदकिशोर साखला, प्रदेशाध्यक्ष केतन शाह, वरिष्ठ प्रदेश उपाध्यक्ष विनयकुमार कोठारी, प्रदेश सचिव प्रवीण पारख यांच्या उपस्थितीत शहराध्यक्ष म्हणून राजेश लुनिया यांचे नाव घोषित करण्यात आले. त्यानंतर जिल्हाध्यक्ष विजयकुमार जैन यांच्याहस्ते त्यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. यावेळी विनयकुमार कोठारी, वरिष्ठ सल्लागार संतोष ओस्तवाल, जिल्हा कार्यकारिणी सदस्य रविराज धोका यांची उपस्थिती होती. आपण शहर कार्यकारणीचे गठन करून संघटन वाढवावे, असे नियुक्तीपत्रात नमूद करण्यात आले आहे.याप्रसंगी श्री. लुनिया यांचा सत्कार करण्यात आला. राजेश लुनिया हे लॉयन्स इंटरनॅशनलचे झोन चेअरमन आहेत. त्यांनी जैन वीर दल, जैन सोशल ग्रुप, लॉयन्स क्लब, जन प्राथमिक विद्यालय, मारवाडी युवा मंच आणि लिओ क्लबचे अध्यक्ष, जैन इंग्लिश स्कूलचे कार्याध्यक्ष, श्री वर्धमान स्थानकवासी जैन श्रावक संघाचे विश्वस्त, जैन हायस्कूलचे प्रतिनिधी, नेहरू रोड युवा मंचचे सचिव म्हणून जबाबदारी पार पडलेली आहे. शहराध्यक्षपदी नियुक्तीबद्दल राजेश लुनिया यांचे सर्वस्तरातून अभिनंदन होत आहे.

## फॉलकोण इंटरनॅशनल स्कुल राज्य पातळीवर शालेय निवड




जालना दि.१३ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- फाल्कन शालेंनी पदकांची कमाई एक स्वर्ण तीन रोपण एक कास्यपदक कमाई जालना-छत्रपती संभाजीनगर येथील शिवनेरी लाँच केली आहे. तीन कप व एक कास्यपदक अशी पाच पदकाची कमाई केली.

मसीरा आरिफ शेख, स्वर्ण पदक, मरियम इमरान खान, रौप्य पदकमोहम्मद अली अमजद, रोप्य पदक अल्तमश सलीम शेख, रौप्य पदक मुजक्किर अकरम न कांस्य जिल्हा अधिकारी अधिकारी व युवाालय पुणे अंतर्गत जिल्हा पुणे कार्यालय परिषद छत्रपती संभा नगर व महास्त्ङ्मांक मार्शल असोसिएशन, संयुक्त राज्य शालेय शस्त्रास्त्र मार्शल आर्ट क्लोज आयोजित केली होती. कुटचे उद्घाटक जिल्हया कुल अधिकारी बाजीराव देसाई, कुल अधिकारी रामकिंदे, राज्य विश्वाचे सचिव मिलिंद कटमोरे यांचे अधिकारीतले व या सर्वांना जिल्हा अधिकारी संजय गाढवे, सरगुंड अधिकारी डॉ, रेखाफचे अध्यक्ष अल्ता नाथानी सर, प्राचार्य छाया खरमल सर, प्रधान मुबशिरा मॅडम सचिव ,शाले शिक्षक जुमान खान शिक्षक, निसाराचे अध्यक्ष त्यांनी दिले

## महेंद्रा हाऊसिंग फायनान्स कंपनीला ग्राहक आयोगाचा दणका - अँड. महेश धन्नावत

जालना दि.१३ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- कर्ज खाते बंद करून देखील व कोणतेही प्रकरण कर्जदारा विरुध्द प्रलंबीत नसतांना त्या संदर्भात माहिती सिबील कंपनीला माहिती न दिल्याने जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग जालना यांनी अँड. कैलाश सखाराम जाधव विरुध्द शाखा व्यवस्थापक महिंद्रा हाऊसिंग फायनान्स कंपनी या प्रकरणात फायनान्स कंपनीच्या विरोधात निर्णय देऊन त्यांना कर्ज संदर्भात योग्य माहिती सिबिल कंपनीला देणे बाबत आदेशीत केले तथा तक्रारदाराला झालेल्या मानसिक व शारिरीक त्रासापोटी रुपये पंचवीस हजार तथा तक्रारीचा खर्च रुपये पाच हजार तीस दिवसाच्या आत देण्याचे आदेश दिले. सदर आदेशावर जिल्हा ग्राहक आयोगाच्या अध्यक्षा अर्पना काटे, सदस्य संतोष निकुले, सदस्य उदय दळवी यांची स्वाक्षरी आहे.

तक्रारदाराची बाजु आयोगासमक्ष अँड. महेश धन्नावत यांनी मांडली. या प्रकरणात तक्रारदार यांचे कर्ज खाते बंद केल्यानंतर देखील त्याच्या विरुध्द न्यायालयात प्रकरण प्रलंबीत असल्याचे सिबिल मध्ये दर्शवित होते. ग्राहक आयोगापुढे तक्रार दाखल झाल्यानंतर सुध्दा फायनान्स कंपनीने कोणतेही सुट प्रलंबीत असल्याबद्दल कोणतही माहिती आयोगा समक्ष दिली नाही. तसेच आरबीआयच्या नियमाप्रमाणे फायनान्स कंपनीने योग्य माहिती सिबिल कंपनीला देणे गरजेचे असल्याने या प्रकरणात आयोगाने फायनान्स कंपनी विरुध्द निकाल दिला. या निकालामुळे फायनान्स कंपनी योग्य माहिती सिबिल कंपनीला देतील अशी आशा अँड. महेश धन्नावत यांनी व्यक्त केली.

# कधीही पुरे न पडणारे: भारताच्या ६०% सँडविच जनरेशनला भविष्यात आर्थिक सुरक्षेची चिंता, एडलवाइज लाईफच्या अभ्यासातून निष्कर्ष समोर

मुंबई दि.१३ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- आपले पालक आणि मुलांना सर्वोत्तम जीवन उपलब्ध करून देण्यावर लक्ष केंद्रित केल्याने, भारतातील सँडविच पिढी स्वतःच्या भविष्यासाठी तयार नाही असे वाटते. ''मी कितीही बचत केली किंवा गुंतवणूक केली तरी ती भविष्यासाठी पुरेशी नाही,'' असे मत ६०% लोकांनी व्यक्त केले आहे.

सँडविच जनरेशनची व्याख्या ३५-५४ वर्षे वयोगटातील व्यक्ती म्हणून केली जाते. ही पिढी त्यांचे वृद्ध पालक आणि वाढत्या वयांची मुले अशा दोन पिढ्यांना आर्थिक संरक्षण उपलब्ध करून देतात. जीवन विमा कंपनीने यूगोव्हच्या सहकार्याने १२ शहरांमधील या पिढीतील ४,००५ प्रतिसादकर्त्यांचे दृष्टिकोन, विश्वास आणि आर्थिक सज्जतेची पातळी समजून घेण्यासाठी सर्वेक्षण केले.

एडलवाइज लाइफ इन्शुरन्सचे एमडी आणि सीईओ सुमित राय म्हणाले, ''गेल्या काही वर्षांत आमच्या ग्राहकांशी झालेल्या संवादातून, सँडविच जनरेशन त्यांचे पालक आणि मुलांची देखभाल करण्याच्या चक्रात कसे जीवन जगत आहेत हे आम्ही बारकाईने पाहिले. गरजा इच्छांच्या मोबदल्यात येत नाहीत असे महत्त्वाकांक्षी जीवन उपलब्ध करताना त्यांना आरोग्यसेवा आणि शिक्षणासारख्या आवश्यक गोष्टी सक्षम करायच्या आहेत. हे प्रामुख्याने त्यांच्या आर्थिक निर्णय घेण्याच्या प्रक्रियेला चालना देते आहे. या प्रक्रियेत, ही सँडविच जनरेशन अनेकदा त्यांची स्वतःची स्वप्नं मागे ढकलते. ज्यामुळे आपण भविष्यासाठी तयार नाही अशी त्यांची धारणा होते.''

कुटुंबाच्या आर्थिक निर्णयांबद्दल त्यांची कर्तव्य आणि प्रेमाबद्दल, आमच्या अभ्यासातून या पिढीतील आर्थिक गैरजोडणी किंवा पैशाची कमतरता सूचित होते (मनी डिस्मॉर्फिया, सोप्या शब्दात, एखाद्याच्या आर्थिक परिस्थितीबद्दल नाखूषी) ५०% पेक्षा जास्त लोक वेगवेगळ्या विधानांशी सहमत आहेत. ज्यात पैसे संपल्याची चिंता करणे, नेहमी मागे राहणे आणि आपण पुरेशी चांगली कमाई करत नाही अशी भावना निर्माण होते.

''या पिढीला त्यांच्या प्रमुख आकांक्षा माहित आहेत. त्यांच्या पसंतीच्या उत्पादन श्रेणींमध्ये गुंतवणुकीद्वारे पुरेसे नियोजन केले जाईल असा विश्वास आहे. पण आमच्या अभ्यासातून काही रोचक तथ्ये समोर आली आहेत. पुढील १-२ वर्षांसाठी या सक्रिय गुंतवणुकीला चिकटून राहण्याचा त्यांचा हेतू कमी दिसून येतो. पूर्वनिर्धारित उद्दिष्टांसाठी राखून ठेवलेल्या त्यांच्या गुंतवणुकींपर्यंत त्यांनी वेळेआधीच प्रवेश केला आहे. ते अस्थिर स्थितीत आहेत असे त्यांना वाटत आहे यात आश्चर्य नाही,'' राय पुढे म्हणाले.

जीवन विमा, आरोग्य विमा, म्युच्युअल फंड, इक्विटीज आणि बँक एफडी या त्यांच्या पहिल्या ५ पसंतीच्या उत्पादनांच्या श्रेणींमध्ये-६०% पेक्षा कमी लोकांकडे सध्या सर्व श्रेणींमध्ये सक्रिय गुंतवणूक आहे. पुढील १-२ वर्षांत ही गुंतवणूक त्यांच्यासोबत राहण्याची अपेक्षा देखील कमी आहे. पुढील तपासणी केल्यावर, अभ्यासातून असे दिसून आले की या सर्व उत्पादनांच्या श्रेणी अकाली वापरण्यात आल्या आहेत. म्हणजेच त्यांची पूर्व-निर्धारित उद्दिष्टे पूर्ण होण्यापूर्वीच त्यांचा वापर केला गेला आहे. अत्यावश्यक गरजांपोटी दिवाळखोरीची स्थिती दिसत असताना, सुट्टी, उत्सवांदरम्यानचा खर्च आणि इतर महत्त्वाच्या नसलेल्या गंभीर गरजा देखील चालक म्हणून उदयास आल्या आहेत. या पिढीच्या प्रमुख आकांक्षा मुलांच्या भवितव्यावर (शिक्षण आणि विवाहाची तरतूद) पालकांच्या आरोग्यविषयक गरजा आणि कुटुंबाचे जीवनमान सुधारण्यावर केंद्रित आहेत. सुमारे ९४% लोकांच्या मते त्यांच्याकडे एकतर तपशीलवार योजना आहे. त्यांनी काही प्रमाणात नियोजन हाती घेतले आहे. बहुसंख्य ७२% लोक असे मानतात की त्यांची गुंतवणूक विशिष्ट आकांक्षांशी जोडलेली आहे. तथापि, ६४% लोकांनी सांगितले की ते त्यांच्या अल्पकालीन गरजा भागविण्यासाठी काही प्रकारचे कर्ज वापरतात. तर ४९% बचत करतात. रोख/उत्पन्नासह कर्ज त्यांना आरोग्यसेवा आणि शिक्षणासारख्या गंभीर गरजा पूर्ण करण्यास अनुमती देत आहे, असे अभ्यास सूचित करतो. परंतु त्यांना सुट्टी, घराचे नूतनीकरण इ. सारख्या महत्त्वाच्या नसलेल्या गंभीर गरजा पूर्ण करण्यासाठी लवचिकता देखील उपलब्ध करत आहे. दीर्घकालीन आकांक्षांसाठी, ७९% लोक आर्थिक साधनांमधून परतावा किंवा नफ्यावर अवलंबून राहण्याची अपेक्षा करतात. सुमारे ७१% नियमित भविष्यातील उत्पन्नावर अवलंबून असतात. ही पिढी निवृत्तीला त्यांच्या पहिल्या ३ दीर्घकालीन आकांक्षांपैकी एक मानते. ज्या काळात एखाद्याला नियमित उत्पन्न मिळणे बंद होते; हे लक्षात घेणे मनोरंजक आहे.

# भारतीय बाजारपेठेत तांत्रिक क्रांती घडवून आणण्यासाठी विका इंडिया सज्ज

पुणे दि.१३ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- विका इंडियाने १२ फेब्रुवारी २०२५ रोजी त्यांच्या पुण्यातील प्लांटमध्ये एक इन-हाऊस पत्रकार परिषद आयोजित केली होती, ज्यामध्ये आघाडीच्या मीडिया हाऊसेसचे प्रतिष्ठित प्रतिनिधी उपस्थित होते. हा कार्यक्रम विका ग्रुपच्या वाढीच्या प्रवासावर, विका इंडियाच्या सततच्या प्रगतीवर आणि भारतीय बाजारपेठेतील भविष्यातील योजनांवर चर्चा करण्यासाठी एक महत्त्वाचा व्यासपीठ ठरला. या काळात, कंपनीने गुंतवणूक योजना, नवीन उत्पादन लाँच, शाश्वतता उपक्रम आणि नवीन बाजार विभागांवर लक्ष केंद्रित करणे यासारख्या महत्त्वाच्या घोषणा केल्या.

पत्रकार परिषदेदरम्यान, विका इंडियाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी माध्यमांशी खुली चर्चा केली. या प्रसंगी विक इंडियाचे वरिष्ठ उपाध्यक्ष श्री. गौरव बावा, सहाय्यक उपाध्यक्ष (उत्पादन) श्री. हेमंत सरनोत, विक्री प्रमुख श्री. विक्रमजीत धिंग्रा आणि विक ग्रुपचे न्यूक्लियर बिझनेस डायरेक्टर श्री. व्हिक्टर ओल्डनबर्गर उपस्थित होते.




या चर्चेत बाजार विस्तार, डिजिटल परिवर्तन आणि उच्च दर्जाच्या नाविन्यपूर्ण उपायांबद्दल विका इंडियाच्या वचनबद्धतेवर प्रकाश टाकण्यात आला.

विक इंडियाच्या वाढीबद्दल बोलताना, वरिष्ठ उपाध्यक्ष श्री गौरव बावा म्हणाले, ''भारतातील आमचा प्रवास अचूकता, नावीन्य आणि शाश्वततेवर आधारित आहे. आम्ही प्रगत उत्पादन आणि प्रभावी सीएसआर उपक्रमांमध्ये सतत गुंतवणूक करत आहोत.'' डिजिटायझेशनवर बोलताना ते म्हणाले, ''विका त्यांच्या ऑपरेशन्समध्ये आयओटी आणि इंडस्ट्री ४.० तंत्रज्ञान एकत्रित करत आहे, कार्यक्षमता, अचूकता आणि भाकित देखभाल वाढवत आहे.'' ऊर्जा आणि अणु क्षेत्रात ची भूमिका ऊर्जा क्षेत्रातील च्या भूमिकेवर चर्चा करताना श्री विक्रमजीत धिंग्रा म्हणाले, ''आमची ऊर्जेची पुनर्परिभाषा मोहीम वीज पारेषण आणि वितरणातील विकाच्या कौशल्याचे प्रदर्शन करते, ज्यामुळे अधिक कार्यक्षम आणि शाश्वत ऊर्जा परिसंस्था सक्षम होते.'' 'मेक इन इंडिया' उपक्रमात पुणेच्या भूमिकेवर भर देताना, श्री हेमंत सरनोत म्हणाले, ''स्थानिकीकृत उत्पादन उच्च दर्जाचे, जलद वितरण आणि चांगले ग्राहक समर्थन सुनिश्चित करते.'' भारताच्या अणुऊर्जा क्षेत्रातील वाढत्या संधींवर प्रकाश टाकताना, श्री. व्हिक्टर ओल्डनबर्गर म्हणाले, ''भारताच्या वाढत्या अणुऊर्जा क्षेत्रामुळे आम्हाला मोठी संधी मिळते. उच्च-परिशुद्धता उपकरणे आणि सुरक्षा उपायांसह या वाढीला पाठिंबा देण्यासाठी विका चांगल्या स्थितीत आहे. आमचे अत्याधुनिक दाब आणि तापमान मापन तंत्रज्ञान कठोर उद्योग मानकांचे पालन करते आणि या क्षेत्रातील गंभीर आव्हानांवर उपाय प्रदान करते.''

या पत्रकार परिषदेद्वारे, विका इंडियाने नवोन्मेष, शाश्वतता आणि ग्राहक-केंद्रित वाढीप्रती आपली वचनबद्धता पुन्हा व्यक्त केली. कंपनी विविध उद्योगांना प्रभावीपणे सेवा देण्यासाठी तिच्या तांत्रिक क्षमतांचा विस्तार आणि बाजारपेठेतील उपस्थिती आणखी मजबूत करण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे.

# देशातील सर्वोत्कृष्ट ३० हेअरस्टायलिस्टमध्ये औरंगाबादचा हेअरस्टायलिस्ट नितीन शेजवळ; औरंगाबादसाठी अभिमानास्पद

छत्रपती संभाजीनगर दि.१३ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- गोदरेज प्रोफेशनल स्पॉटलाइट या राष्ट्रीय पातळीवरील हेअरस्टायलिस्ट स्पर्धेत ऑथेंटिक सलून आणि ॲकॅडमी (संबाजीनगर) येथील नितीन शेजवळ हे टॉप तीस फायनलिस्टमध्ये निवडले गेले आहेत. ही औरंगाबादसाठी अत्यंत अभिमानाची गोष्ट आहे. केसांचा रंग तसेच केसांची निगा राखणारा गोदरेज कन्झ्युमर प्रॉडक्ट्स लि. चा प्रमुख व्यावसायिक हेअर ब्रँड गोदरेज प्रोफेशनलने या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. हेअरस्टायलिस्टची हटके प्रतिभा ओळखणे तसेच त्यांच्या व्यावसायिक वाढीस समर्थन देणे हे गोदरेज प्रोफेशनल स्पॉटलाइटचा हेतू आहे. मुंबईत झालेल्या या महाअंतिम फेरीत देशभरातून निवडलेले ३० प्रतिभावान सहभागी झाले होते. प्रत्येक फायनलिस्टने रॅम्पवर गोदरेज प्रोफेशनलच्या क्युरेटेड हेअर कलर कलेक्शनचे अत्यंत देखणे सादरीकरण केले. इतर २९ फायनलिस्टसह ग्रँड फिनाले इव्हेंटमध्ये सहभागी झालेल्या नितीन यांनी हेअरकलर्सचे उत्तम प्रदर्शन केले. ३० कुशल व्यावसायिकांच्या या पहिल्या तुकडीला यियान्नी त्सपाटोरी, गोदरेज प्रोफेशनलचे हेअरचे क्रिएटिव्ह डायरेक्टर, आदरणीय मार्गदर्शक शैलेश मूल्या, नॅशनल टेक्निकल हेड आणि नजीब-उर-रेहमान, गोदरेज प्रोफेशनलचे टेक्निकल अँबेसेडर यांच्या नेतृत्वाखाली मास्टरक्लासमध्ये सहभागी होण्याची अनोखी संधी मिळाली. अभिनव ग्रांधी, महाव्यवस्थापक, गोदरेज कंझ्युमर प्रॉडक्ट्स लिमिटेड, म्हणाले, ''६ दशलक्षाहून अधिक सलूनसह, भारताचा सलून उद्योग हा सर्वात वेगाने वाढणाऱ्या क्षेत्रांपैकी एक आहे, तरीही प्रतिभावान हेअर स्टायलिस्ट दाखवण्यासाठी प्लॅटफॉर्मचा अभाव आहे. गोदरेज प्रोफेशनल स्पॉटलाइटला मिळालेल्या उदंड प्रतिसादासाठी आम्ही आनंदी आहोत. आम्हाला याचा अभिमान वाटतो. हे व्यासपीठ प्रतिभावान केशरचनाकारांना त्यांची सर्जनशीलता दाखवण्याची केवळ संधी देत नाही तर या क्षेत्रातील शिक्षण तसेच प्रशिक्षणाप्रती आमची बांधिलकी देखील दर्शवते. या उपक्रमाद्वारे, वाढत्या स्पर्धात्मक बाजारपेठेत उत्कृष्ट कामगिरी करण्यासाठी आवश्यक कौशल्ये आणि संधीसह हेअर स्टायलिस्टला सक्षम करण्याचे आमचे ध्येय आहे. भारतातील सलून व्यावसायिकांना संधी आणि त्यांची प्रगती करण्याच्या आमच्या दीर्घकालीन वचनबद्धतेच्या दिशेने हे आमचे एक पाऊल आहे.''

# एअर कंप्रेसर ऑपरेशनमध्ये क्रांती: एल्जीने ग्राउंड-ब्रेकिंग ''स्टॅबिलायझर'' तंत्रज्ञानाचे केले अनावरण!

पुणे दि.१३ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- औद्योगिक एअर कंप्रेशन क्षेत्रात मोठी झेप घेत, एल्जी उपकरणे (बीएसई: ५२२०७४ एन एस ई: एल्जी इक्विपमेंट्स), ज्याला ६४ वर्षांहून अधिक काळ कंप्रेस्ड एअर एक्सीलेंसचा अनुभव आहे आणि जगभरातील आघाडीच्या एअर कंप्रेसर उत्पादकांपैकी एक मानले जाते, यांनी आज त्यांच्या अग्रगण्य कंप्रेस्ड एअर स्टॅबिलायझेशन तंत्रज्ञानाची घोषणा केली. स्टॅबिलायझर सिस्टम प्लांटमधील डायनॅमिक एअर डिमांडनुसार कंप्रेसर कार्यपद्धतीत आमूलाग्र बदल घडवून आणण्यासाठी डिझाइन करण्यात आले आहे. याचा उद्देश अस्थिर कंप्रेसर कार्यक्षमता, अक्षमता आणि वारंवार होणाऱ्या लोड/अनलोड सायकलमुळे होणारे अतिरिक्त घर्षण यांसारख्या जुन्या आव्हानांना दूर करणे आहे. औद्योगिक सेटअपमध्ये, कंप्रेसर क्षमता आणि प्लांट एअर डिमांड यामधील तफावत स्वाभाविकरित्या डायनॅमिक असते. ही अस्थिरता वारंवार कट-इन आणि कट-आउट ऑपरेशन्स घडवून आणते, ज्यामुळे कंप्रेसर अस्थिर होतो आणि त्याच्या महत्त्वाच्या फ्लो आणि काइनेटिक कंपोनेंट्स प्रभावित होतात. पारंपरिक उपाय, जसे की रिझर्वॉयर व्हॉल्यूम वाढवणे, कट-इन/कट-आउट प्रेशर बदलणे, किंवा वेरिएबल फ्रिक्वेंसी ड्राइव्हस् जोडणे, अनेकदा अपयशी ठरतात आणि नवीन अक्षमतांना किंवा उच्च ऑपरेशनल खर्चाला जन्म देतात. ''स्टॅबिलायझर सिस्टम'' ही पहिल्यांदाच वापरण्यात आलेली '' पुनरावृत्ती आणि पुनर्प्राप्त करा'' संकल्पना अवलंबते, जी नियंत्रित पुनःसंचारण आणि पुनर्प्राप्ती तंत्रांद्वारे कंप्रेसरची क्षमता प्लांट एअर डिमांडनुसार सरेखित करते. या तंत्रज्ञानाद्वारे एअरफ्लो स्थिर करून लोड/अनलोड सायकल कमी केले जातात, परिणामी साधनांचे आयुष्य वाढते, ऊर्जा वापरात सुधारणा होते (१५% पर्यंत ऊर्जा बचत होते) आणि संपूर्ण सिस्टम अधिक कार्यक्षम बनते. याचा ऊर्जा-कुशल डिझाइन आणि घर्षण कमी करण्याची क्षमता, हे ग्लोबल सस्टेनेबिलिटी गोल्सशी सरेखित करते.

'' स्टॅबिलायझर'' तंत्रज्ञानाचा औद्योगिक प्लांट्समध्ये अवलंब अधिक हरित (ग्रीन) आणि खर्च-प्रभावी उत्पादन प्रक्रियेच्या दिशेने एक महत्त्वाचा टप्पा आहे,'' असे डॉ. जयाराम वरदराज, व्यवस्थापकीय संचालक, एल्जी इक्विपमेंट्स लि.यांनी सांगितले.

# टोयोटा किर्लोस्कर मोटरने शाश्वत गतिशीलतेसाठी वचनबद्धता केली अधिक दृढ

मुंबई दि.१३ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- २०४७ पर्यंत ऊर्जा स्वावलंबन आणि २०७० पर्यंत नेट झिरो म्हणजेच शून्य कार्बन उत्सर्जन साध्य करण्याच्या भारताच्या दृष्टिकोनाशी आपली वचनबद्धता दृढ करत, टोयोटा किर्लोस्कर मोटर (टिकेएम) ने आज इंडिया एनर्जी वीक २०२५ मध्ये भाग घेतला. हा कार्यक्रम ११ ते १४ फेब्रुवारी २०२५ दरम्यान दिल्लीत आयोजित केला जात आहे. इंडिया एनर्जी वीक (आयईडब्ल्यू) २०२५ हे स्वच्छ ऊर्जा उपाय सादर करण्यासाठी आणि ऊर्जा स्वावलंबन तसेच कार्बन उत्सर्जन कमी करण्याच्या दिशेने महत्त्वाचे व्यासपीठ आहे. ऊर्जा परिस्थिती, तंत्रज्ञान, उद्योगातील ट्रेंड आणि धोरणात्मक दृष्टीकोनांवर चर्चा व्हावी म्हणून हा कार्यक्रम जागतिक राजकीय नेते, धोरणकर्ते, तज्ज्ञ आणि अंतिम उपभोक्त्यांना एकत्र आणतो

टोयोटोनेने स्थानिक हरित ऊर्जेवर आधारित शाश्वत गतिशीलता उपायांवर भर देत अनेकांगी दृष्टिकोनावर आधारित विविध पर्यायी पॉवरट्रेन तंत्रज्ञान सादर केले. कार्बन उत्सर्जन कमी करण्यासाठी आणि जीवाश्म इंधनावरील अवलंबित्व कमी करण्यासाठी विद्युतीकरण आणि पर्यायी इंधन यासारख्या अनेक हरित ऊर्जा मार्गांचा विचार केला जात आहे. भारताच्या ऊर्जा मिश्रण, ग्राहकांच्या विविध श्रेणी आणि त्यांच्या गरजा, पायाभूत सुविधांची उपलब्धता आणि 'आत्मनिर्भर भारत' या सरकारच्या दृष्टीकोनाच्या पार्श्वभूमीवर, 'मेक इन इंडिया' अंतर्गत देशासाठी उपयुक्त स्वच्छ तंत्रज्ञान विकसित करण्यावर टोयोटा भर देत आहे.

भारताच्या वेगवान अर्थव्यवस्था वाढीमुळे आणि नवीन वाहनांच्या वाढत्या विक्रीमुळे विद्युत वाहन आणि पर्यायी इंधनावर चालणारे स्वच्छ तंत्रज्ञान काळाची गरज बनले आहे.अशा परिस्थितीत इथेनॉल हे स्वदेशी, तत्काळ फायदा देणारे स्वच्छ आणि प्रभावी ऊर्जा स्त्रोत आहे, ज्यामुळे जीवाश्म इंधनाची गरज, ऊर्जा आयात खर्च आणि कार्बन उत्सर्जन मोठ्या प्रमाणात कमी होऊ शकते. तसेच, इथेनॉलच्या वापरामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढण्यास मदत होते, ग्रामीण अर्थव्यवस्था बळकट होते आणि ऊस व अन्नधान्याच्या अतिरिक्त उत्पादनातून सरकारलाही महसूल वाढविता येतो. याशिवाय, सरकारने पराली (शेती अवशेष) पासून इथेनॉल तयार करण्यासाठी नवीनतम तंत्रज्ञान विकसित केले आहे. यामुळे वातावरण प्रदूषण टाळता येईल आणि कचऱ्यापासून उपयुक्त पदार्थ निर्मिती शक्य होईल. टोयोटो किर्लोस्कर मोटरचे भारतातील प्रमुख आणि कॉर्पोरेट अफेअर्स आणि गव्हर्नन्स विभागाचे कार्यकारी उपाध्यक्ष विक्रम गुलाटी यांनी कार्यक्रमादरम्यान सांगितले की ''इंडिया एनर्जी वीक हे ऊर्जा, गतिशीलता आणि तंत्रज्ञानआधारित कंपन्यांना एकत्र आणण्याचे महत्त्वाचे व्यासपीठ आहे. हे व्यासपीठ शाश्वत गतिशीलतेसह स्वच्छ इंधन पर्यायांवर जनजागृती करण्यास मदत करते.''

याच संपूर्ण पर्यावरणपूरक व्यवस्थापनेच्या दृष्टीने टोयोटाने २०१५ मध्ये ''टोयोटा ग्लोबल इन्व्हरमेंटल चॅलेंज २०५० ची (टीईसी २०५०)'' सुरुवात केली. याअंतर्गत कार्बन उत्सर्जन, पाणीटंचाई आणि जैवविविधतेच्या हानीसारख्या पर्यावरणीय समस्यांवर उपाययोजना शोधण्याचा प्रयत्न केला जातो. पर्यावरण आणि समाजावर सकारात्मक परिणाम साधण्याच्या तत्त्वावर आधारित, टीईसी २०५० मध्ये स्वच्छ उर्जेचा अवलंब आणि ऊर्जा कार्यक्षमतेत सुधारणा करण्याच्या धोरणांचा समावेश आहे. यामुळे फक्त वाहन उत्पादन नव्हे, तर कारखान्यांचे संचालन आणि संपूर्ण मूल्यसाखळी कार्बन विरहित करण्यावर भर दिला जातो. टोयोटा आपल्या शाश्वत गतिशीलता उपायांना वेगाने पुढे नेत आहे. हे केवळ वाहनांपुरते मर्यादित न राहता, उत्पादन प्रक्रियेसाठी नवीकरणीय ऊर्जा स्वीकारणे, स्थानिकीकरण मजबूत करणे आणि 'मेक इन इंडिया' अंतर्गत कौशल्य विकासाच्या उपक्रमांना बळकटी देणे यावर भर देत आहे, जेणेकरून जागतिक स्तरावर स्पर्धात्मक उत्पादन पर्यावरण निर्माण करता येईल. संपूर्ण मूल्यसाखळीत स्वच्छ ऊर्जा एकत्रित करून, टोयोटा केवळ शाश्वतता वाढवण्याचेच नाही, तर भारताला ऊर्जा-समृद्ध आणि आत्मनिर्भर बनवण्याचे लक्ष्य ठेवते, जे देशाच्या नेट-झिरो (शून्य कार्बन उत्सर्जन) दृष्टिकोनाशी सुसंगत आहे.

# संरक्षण क्षमता महोत्सव - २०२५ चे आयोजन, शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी विविध उपक्रम

छत्रपती संभाजीनगर दि.१३ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- सक्षम-२०२५ (संरक्षण क्षमता महोत्सव) हा एक महत्वाचा राष्ट्रीय कार्यक्रम आहे जो आपल्या देशाच्या ऊर्जा सुरक्षा, शाश्वत विकास आणि पर्यावरण संरक्षणासाठी भारत सरकारने सुरू केला आहे. जीवाश्म इंधनावरील व्यर्थ खर्चाला आळा घालणे, परकीय तिजोरीवरील वाढते ओझे कमी करणे आणि जीवाश्म इंधनांच्या ज्वलनामुळे निर्माण झालेल्या हरितगृह वायूच्या प्रतिकूल परिणामापासून पर्यावरणाचे रक्षण करणे हे या कार्यक्रमाचे अंतिम लक्ष्य आहे.

पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालय तसेच तेल उद्योगाचे राज्यस्तरीय समन्वयक जनजागृतीकरण्यासाठी संबंधित राज्य सरकारच्या सक्रिय सहभागाने समर्थनासह विविध उपक्रम हाती घेतात..पेट्रोलियम उत्पादनांच्या संवर्धनासाठी, इंधन-कार्यक्षम उपकरणांना प्रोत्साहन देण्यासाठी आणि पेट्रोलियम संवर्धनासाठी धोरणे आणि धोरणे प्रस्तावित करण्यात सरकारला मदत करण्यासाठी तेल विपणन कंपन्या (ओएमसी) आघाडीवर आहेत.त्याच कळकळी ने सक्षम (संरक्षण क्षमता महोत्सव) २०२४-२५ हे१४ फेब्रुवारी २०२५ ते २८फेब्रुवारी, २०२५ दरम्यान आयोजित केले जातील, संपूर्ण देशभर ज्याची टॅगलाइन ''ग्रीन अँडक्लीन एनर्जीद्वारे क्लीन एन्व्हायर्नमेंट'' असेल (हरित आणि स्व च्छ ऊर्जेचे अंगिकार करा आणि पर्यावरणास स्वनच्छग बनवा)१४ फेब्रुवारी २०२५ ते २८ फेब्रुवारी, २०२५ पर्यंततेल विपणन कंपन्या (ओएमसी) राज्यभरात संवर्धनाबद्दल जागरूकता निर्माणकरण्यासाठी आणिशाश्वतविकास आणि पर्यावरणसंरक्षणासाठी वर्तनात्मक बदलांना प्रोत्साहन देण्यासाठी विविध उपक्रम राबवतील.याचाच एक भाग म्हणून, महाराष्ट्रातील तेल उद्योग १४ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता वाय.बी. चव्हाण सेंटर, रंग स्वरहॉल, मंत्रालयासमोर, मुंबई ४०००२१ येथे उद्घाटन समारंभाचे आयोजन करत आहे. या पंधरवड्यात शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी गटचर्चा / वादविवाद, महाविद्यालयांमध्ये ग्राफिटी / भिंतीचित्रस्पर्धा, इंधनकार्यक्षम ड्रायव्हिंगस्पर्धा, लेखलेखन, पत्रकार परिषदा आणिटीव्ही / रेडिओवरील टॉकशो असे विविध उपक्रम राबवले जातील. सक्षम मोहिमे दरम्यान ओएमसी, शालेय मुले, तरुण,एलपीजी वापरकर्ते, ड्रायव्हर्स/फ्लीटऑपरेटर, उद्योग कर्मचारी/कामगार, शेतकरी, निवासीसंस्था, ग्रामपंचायती, स्वयंसेवी संस्थाइत्यादी विविध मोठ्या वर्गांपर्यंत पोहोचतील आणि इंधन संवर्धना चे महत्त्व, फायदे आणि पद्धतींबद्दल जागरूकता पसरवण्यासाठी आणि इंधन-कार्यक्षम तंत्रज्ञान आणि पद्धतींचा अवलंब करण्यास प्रोत्साहन देण्यासाठी विविध इंधनसंवर्धन उपक्रम राबविले जातील. अशी माहिती पत्रकार परिषद दरम्यान नितीन बजाज, शशांक तिवारी, सचिन साळुंखे यांनी दिली.

# टोयोटा किर्लोस्कर मोटर द्वारे रस्ता सुरक्षा दूतांचे सक्षमीकरण

मुंबई दि.१३ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- रस्ता सुरक्षेसाठी आपल्या दृढ वचनबद्धतेला अधिक बळकट करत टोयोटा किर्लोस्कर मोटरने वार्षिक टोयोटा सेफ्टी एज्युकेशन प्रोग्रॅमची(टीएसईपी) मुंबई येथे यशस्वी सांगता केली. हा कार्यक्रम सोफिया कॉलेजच्या सोफिया भाभा सभागृहामध्ये पार पडलेल्या या कार्यक्रमाने यंदाच्या वर्षातील बंगळुरू, दिल्ली आणि मुंबई या ठिकाणी झालेल्या टीएसईपी उपक्रमांचा समारोप झाला. ''रस्ता सुरक्षा माझा हक्क, माझी जबाबदारी'' या संकल्पनेवर आधारित हा उपक्रम शालेय विद्यार्थ्यांना रस्ता सुरक्षेबाबत जागरूक करून त्यांना जबाबदार नागरिक व रस्ता सुरक्षेचे दूत बनवण्यास मदत करतो. कार्यक्रमात टोयोटा किर्लोस्कर मोटरचे मुख्य संप्रेषण अधिकारी, ज्येष्ठ उपाध्यक्ष आणि राज्य व्यवसायाचे प्रमुख श्री. सुदीप दळवी आणि टोयोटा किर्लोस्कर मोटरच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी उपस्थिती लावली. यामुळे भारतात रस्ता सुरक्षेची संस्कृती वाढवण्यासाठी सर्वांचा सामूहिक प्रयत्न आवश्यक आहे हे अधोरेखित झाले. दरवर्षी भारतात १,५०,००० हून अधिक लोक रस्ता अपघातांमध्ये जीव गमावतात आणि ही संख्या जगातील सर्वाधिक आहे. विशेषतः ५ ते २९ वयोगटातील नागरिकांचा यात सर्वाधिक समावेश आहे. ही परिस्थिती लक्षात घेऊन, टोयोटा किर्लोस्कर मोटरने २००७ साली टोयोटा सेफ्टी एज्युकेशन प्रोग्रॅम-टीएसईपी सुरू केला. आतापर्यंत ८ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांना या उपक्रमाचा लाभ मिळाला आहे. टोयोटा किर्लोस्कर मोटरच्या रियल वर्ल्ड सेफ्टी तत्वज्ञानावर आधारित हा उपक्रम फक्त सुरक्षित वाहने बनवण्यापुरता मर्यादित नसून, लोकांमध्ये रस्ता सुरक्षेची जागरूकता निर्माण करणे आणि रस्त्यांची पायाभूत सुविधा सुधारण्यावरही भर देतो. २०२५ मध्ये, टोयोटो किर्लोस्कर मोटरने बंगळुरू, दिल्ली आणि मुंबईतील १४० शाळांमधील ७०,००० विद्यार्थी आणि ६०० शिक्षकांपर्यंत पोहोचून शून्य रस्ते अपघात मृत्यू साध्य करण्याच्या आपल्या वचनबद्धतेला बळ दिले आहे.

**वृत्तपत्र क्षेत्रातील खणखणीत नाणं**

# ग्लोबल भारत

संपादक – शरद खेमचंद अडागळे

## आपला जिल्हा, शहर, तालुक्यासह भागातील बातम्या नियमित वाचा ‘ग्लोबल भारत’







**मनोरंजन, कृषी, आरोग्य, करिअर यासह विविध विषयावर आठवड्यातून एक दिवस परिपूर्ण माहिती....**

**✻ अधिक माहितीसाठी संपर्क ✻**

dailyglobalbharat@gmail.com
www.globalbharatlive.com